RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर    वर्ष ३४ वे    अंक १४५ वा मंगळवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)    पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26    पृष्ठे – ६    मो:९४२२४७२५०२    किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

संपर्क

जडे ऑफसेट प्रिंटर्स

मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



# पंतप्रधानांनी मारुतीच्या पहिल्या ‘ईव्ही’ला दाखवला हिरवा झेंडा

## भारतात बनवलेली इलेक्ट्रिक कार युरोप, जपानसह १०० देशांमध्ये निर्यात होणार




**अहमदाबाद/वृत्तसंस्था** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी, २६ ऑगस्ट रोजी गुजरातमधील हंसलपूर येथे निर्यातीसाठी ई-व्हिटाराला हिरवा झेंडा दाखवला. ही मारुतीची पहिली इलेक्ट्रिक कार आहे. हे वाहन पूर्णपणे भारतात तयार केले जाते आणि युरोप आणि जपानसारख्या १०० हून अधिक देशांमध्ये निर्यात केले जाईल.

या कारमध्ये ४९ किलोवॅट आणि ६१ किलोवॅट क्षमतेचे दोन बॅटरी पॅक पर्याय असतील. कंपनीचा दावा आहे की ही कार एकदा पूर्ण चार्ज केल्यावर ५०० किलोमीटरपेक्षा जास्त धावेल. फेब्रुवारी २०२५ पासून सुझुकी मोटर गुजरात प्रायव्हेट लिमिटेडच्या प्लांटमध्ये इलेक्ट्रिक एसयूव्हीचे उत्पादन सुरू झाले आहे. ४९ किलोवॅट क्षमतेच्या बॅटरी पॅकसह मारुती ई व्हिटाराच्या बेस मॉडेलची किंमत २० लाख रुपये (एक्स-शोरूम) असू शकते. त्याच वेळी, हाय-पॉवर मोटरसह ६१ किलोवॅट क्षमतेच्या बॅटरी पॅकसह मॉडेलची किंमत २५ लाख रुपये (एक्स-शोरूम) असू शकते.

याशिवाय, e--llgrip -WD आवृत्तीची किंमत ३० लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवली जाऊ शकते. भारतीय बाजारात, e Vitara इलेक्ट्रिक SUV MG ZS EV, Tata Curve EV आणि Hyundai Creta Eत आणि Mahindra BE05 शी स्पर्धा करेल. सुझुकी ई विटारा ही नवीन हार्टेक्ट-ई प्लॅटफॉर्मवर विकसित करण्यात आली आहे, जी कंपनीने टोयोटासोबत सहकार्याने विकसित केली आहे. सुझुकी ई व्हिटाराची बाह्य रचना एतद संकल्पना मॉडेलसारखीच आहे. तिच्या पुढच्या बाजूला पातळ एलईडी हेडलाइट्स आणि वाय-आकाराचे एलईडी डीआरएल आणि स्टायलिश बंपरसह एकात्मिक फॉग लाइट्स आहेत. बॉडी क्लॅडिंग आणि १९-इंच काळ्या चाकांसह, मध्यम आकाराची एसयूव्ही बाजूने खूपच मजबूत दिसते. मागील गेटवरील दरवाजाचे हँडल सी-पिलरवर ठेवलेले आहे. याशिवाय, छतावर इलेक्ट्रिक सनरूफ देखील आहे. ई व्हिटाराच्या मागील बाजूस कॉन्सेप्ट व्हर्जनसारखे ३-पीस लाइटिंग एलिमेंट्ससह कनेक्टेड एलईडी टेल लाईट आहे.

ई-व्हिटारामध्ये ड्युअल-टोन ब्लॅक आणि ऑरेंज केबिन आहे. त्यात २-स्पोक फ्लॅट बॉटम स्टीअरिंग व्हील आणि उभ्या दिशेने असलेल्या एसी व्हेंट्सभोवती क्रोम टच आहे. त्याच्या केबिनचे मुख्य आकर्षण म्हणजे इंटिग्रेटेड फ्लोटिंग स्क्रीन सेटअप, ज्यापैकी एक इन्फोटेनमेंट आहे आणि दुसरे ड्रायव्हर डिस्प्ले आहे. सुझुकीने ई-विटाराची वैशिष्ट्ये उघड केलेली नाहीत, परंतु अशी अपेक्षा आहे की मारुतीची इलेक्ट्रिक कार ऑटोमॅटिक एसी, व्हेंटिलेटेड फ्रंट सीट्स आणि वायरलेस फोन चार्जर सारख्या वैशिष्ट्यांसह येऊ शकते. सुरक्षिततेसाठी, त्यात मानक म्हणून ६ एअरबॅग्ज, ३६०-डिग्री कॅमेरा आणि इलेक्ट्रॉनिक पार्किंग ब्रेक सारखी सुरक्षा वैशिष्ट्ये मिळतील.

युरोपियन बाजारपेठेत, ई व्हिटारा दोन बॅटरी पॅक पर्यायांसह सादर करण्यात आली आहे. यामध्ये ४९ किलोवॅट तास आणि ६१ किलोवॅट तास बॅटरी पॅक पर्याय समाविष्ट आहेत. कंपनीने अद्याप ई व्हिटाराची प्रमाणित श्रेणी जाहीर केलेली नाही, परंतु पूर्ण चार्ज केल्यावर त्याची श्रेणी ५०० किलोमीटरपर्यंत असू शकते अशी अपेक्षा आहे. ही कार २ चाकी ड्राइव्ह आणि ४ चाकी ड्राइव्हच्या पर्यायांसह देखील दिली जाईल.

# अंतरवाली सराटीत सीएम यांचे ओएसडी दाखल

## जरांगे आणि साबळे यांच्यात महत्वपूर्ण चर्चा





**वडीगोद्री/प्रतिनिधी** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे २७ ऑगस्टरोजी अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. याच अनुषंगाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे ओएसडी राजेंद्र साबळे यांनी अंतरवाली सराटी मध्ये येऊन जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) राजेंद्र साबळे मंगळवारी सकाळी मराठा आंदोलक जरांगे यांची भेट घेण्यासाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले. त्यामुळे जरांगे यांच्या उद्याच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी त्यांच्यासोबत थेट वाटाघाटी सुरू केल्याचे चित्र निर्माण झाले आहे. जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उद्या मुंबईच्या दिशेने कूच करण्याची घोषणा केली आहे.

त्यानुसार ते उद्या सकाळी १० वा. आपल्या लाखो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने रवाना होतील. ते मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करणार आहेत. या आंदोलनामुळे मुंबईत लाखो लोकांची गर्दी होणार आहे. त्यातच उद्यापासून गणेशोत्सव सुरू होणार असल्यामुळे मुंबईत कायदा सुव्यवस्थेचा बाका प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने या प्रकरणी एक पाऊल पुढे टाकत जरांगे यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

या प्रयत्नांर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी राजेंद्र साबळे हे जरांगे यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले आहेत. यावेळी जरांगे व साबळे यांच्यात माध्यमासमोरच चर्चा झाली. पत्रकारांशी संवाद साधताना साबळे यांनी आपण केवळ जरांगे यांच्याकडून त्यांच्या मोर्चाचा मार्ग जाणून घेण्यासाठी आल्याचे सांगितले. त्यांची यासंदर्भात काही अडचण आहे का? हे जाणून घेण्याचाही माझा उद्देश आहे. माझी यापूर्वी त्यांच्याशी फोनवर चर्चा झाली होती. सध्या गणेशोत्सव आहे. त्यामुळे आंदोलन पुढे ढकलू शकता का? अशी विनंती मी त्यांना करणार आहे, असे ते म्हणाले.

यावेळी जरांगे पाटील यांनी आम्हाला आझाद मैदानावर जाण्यासाठी कोणताही एक मार्ग द्या. अनेक रस्ते आहेत. त्यातील एक रस्ता आम्हाला द्या, त्यामुळे मुंबईतील गणेश भक्तांना कोणताही त्रास होणार नाही, त्यासाठी आम्ही आंदोलकांसाठी एक मार्ग मागतोय, असे जरांगे पाटील म्हणाले.

# लातूर जिल्हा पोलीस दलाकडून जोरदार शक्ती प्रदर्शन, जिल्हाभरात रुट मार्च चे आयोजन





**लातूर/प्रतिनिधी** : आगामी गणेश उत्सव व ईद-ए-मिलादुन्नबी च्या पार्श्वभूमीवर, लातूर पोलिसांनी शहर आणि जिल्ह्यातील संभाव्य धोके व गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात दिनांक २५ ऑगस्ट रोजी लातूर जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रूट मार्च काढण्यात आला. ‘सुरक्षित लातूर’ उपक्रमांतर्गत आयोजित रूट मार्चद्वारे पोलिसांचा उद्देश गणेशोत्सवात व ईद-ए- मिलादुन्नबी मध्ये कोणतीही अनुचित घटना घडू नये. लातूर पोलिसांची सज्जता दर्शवणे आणि नागरिकांना शांततापूर्ण व सुरक्षित वातावरणात उत्सव साजरा करता यावा हे सुनिश्चित करणे हा असून गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी आणि उत्साह यावर लक्ष ठेवून शांतता व सुव्यवस्था राखून संभाव्य गुन्हेगारी किंवा अनुचित घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि तत्काळ कार्यवाही करण्यासाठी पोलिसांची सज्जता दर्शवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढवणे आणि गणेशोत्सवाचा व आगामी ईद-ए-मिलादुन्नबी च्या आनंद सुरक्षितपणे घेता यावा यामागचा उद्देश आहे.

लातूर पोलिसाकडून सर्व गणेश मंडळांना आवाहन करण्यात येते की, गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासारख्या सुरक्षा उपायांना प्रोत्साहन द्यावे जेणेकरून कोणत्याही घटनेची वेळीच दखल घेतली जाईल.

तसेच हा रूट मार्च लातूर पोलिसांच्या ‘आपले लातूर सुरक्षित लातूर’ या मोठ्या उपक्रमाचा एक भाग असून ज्याचा उद्देश शहरातील आगामी सन उत्सव सुरक्षित व निर्विघ्नपणे पार पाडावे हे आहे. या उपक्रमांतर्गत लातूर पोलिसांकडून गणेश मंडळांनाही सुरक्षा नियमांचे पालन करण्यासाठी आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. सदर रूट मार्चमध्ये जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदारांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता.

# चक्री भजनानंतर दहीहंडी फोडून श्रावणानुष्ठानाची सांगता

**औसा/प्रतिनिधी** : अभिर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग.. सद्गुरु वीरनाथ मल्लिनाथ दासवीनाथ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पावन परंपरेतील वार्षिक श्रावण तपो अनुष्ठानाची सांगता पीठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात व सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात भक्ति उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात अभीर गुलाल बुक्का आणि पुष्प पाकळ्यांच्या वर्षावात उधळण करीत चक्रीभजन सेवा व ज्ञानेश्वरी प्रवचनानंतर दहीहंडी फोडून गोपाळ कल्याणी संपन्न झाली. चक्रीभजन ही या गुरु गादीची मुख्य उपासना असून मायामोह जंजाळातून मुक्त करणारी ही दिव्य साधना होय असे विचार सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगता दिनी आपल्या प्रवचनात मांडले. किंबहुना तुमचे केले धर्मकीर्तन ही सिद्धी नेले तेच माझे जे उरले पाईक पण या ज्ञानेश्वरीतील ओवीने आरंभ करून उपस्थित हजारो नाथभक्तांशी हितगुज करताना अनुष्ठानाचे महत्त्व मोठे आहे. यात तन मन धनाने सेवा नामस्मरण करणारे नित्यनेमाचे सेवेकरी आहेत. शरीरात असलेला नकारात्मक विचार नष्ट होऊन सकारात्मकता निर्माण होणे व भक्तीची ज्योत प्रज्वलित होऊन गुरू गादींची सद्गुरु समवेत सेवा घडणे हे भाग्याचे आहे. भजनात कळणारा न कळणारा ज्ञानी अज्ञानी लहानथोर प्रत्येक जीव चक्रीभजन सुरू झाल्यानंतर हाताने टाळी आणि मुखाने नाम घ्यायला लागतो. अवघ्या काही क्षणात तो त्या भजनाशी एकरूप होतो ही अनुभवास येणारी गोष्ट आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मुख्यमंत्री शंभर दिवसांचा कार्यालयीन सुधारणा मोहीम कागदोपत्रीच...

## चिमटा दयाचा



शेतकऱ्याकडे सोयाबीन संपत आल्यावर दर वाढत आहेत ! शेतकऱ्याच्या नशीबाची अशीच थट्टा चालू आहे !!

## बँकेमध्ये पैसे भरायला गेलेल्या ग्राहकाचे पैसे चोरणाऱ्या आरोपीला अवघ्या काही तासातच

# चोरलेल्या पैशासह पोलिसांनी केली अटक



**लातूर/प्रतिनिधी** : बँकेमध्ये पैसे भरायला गेलेल्या ग्राहकाचे पैसे चोरणाऱ्या आरोपीला अवघ्या काही तासातच चोरलेल्या पैशासह पोलिसांनी केली अटक केली असून अधिक माहिती अशी की, दि. २५ ऑगस्ट रोजी मजगे नगर लातूर येथील एका बँकेमध्ये पैसे भरण्यासाठी गेलेल्या ग्राहकाचे स्लिप भरत असतांना बाजुला ठेवलेली ९० हजार रुपये ची रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरुन घेवुन गेल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे गांधी चौक येथे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस ठाणे गांधी चौक येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांना तात्काळ आरोपींचा शोध घेणेबाबत सूचना पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक मंगेश चव्हाण उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी केल्या. वरिष्ठांच्या सूचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक सुनिल रेजीतवाड यांचे नेतृत्वात पथकाने तात्काळ कारवाई करत सदर अनोळखी चोरट्याचा शोध घेवुन काही तासातच ताब्यात घेतले. त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव मनोज भाऊसाहेब वाघमारे रा. म्हाडा कॉलनी लातूर. असे असल्याचे सांगीतले त्याचे कडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस करता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले व चोरी केलेली फिर्यादीची रोख रक्कम ९०,०००/- रु.संबंधिकाकडुन हस्तगत करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अंमलदार अनिल कज्जेवाड हे करीत आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे गांधी चौकचे पथकामधील पोलीस उपनिरीक्षक गणेश गीत्ते, सफौ/राजेंद्र टेकाळे, पोलीस अंमलदार राम गवारे, संतोष गिरी, सचिन चंद्रपाटले, शिवराज भाडुळे, प्रकाश भोसले, राहुल दरोडे, एम.बी.फुटाने यांनी केली आहे.

# उदगीरमध्ये ५.६१ लाखांचा गुटखा पोलिसांनी पकडला : एकाविरुध्द गुन्हा



**लातूर/प्रतिनिधी** : बिदर येथून परभणी जिल्ह्यात इर्टिगा कारमधून ५ लाख ६१ हजार ६०० रुपयांचा जाणारा गुटखा उदगीर शहरातील रिलायन्स पेट्रोलपंपा समोर पकडण्यात आला व तसेच ७ लाख रुपयांची इंडीगा कार असा एकुण १२ लाख ६१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सोमवारी (२५ ऑगस्ट) पहाटे अडीचच्या सुमारास उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२४ ऑगस्ट रोजी रात्री अकराच्या सुमारास इंडीगा कार क्र.एम एच १३ बी एन ०९१२ या कारमधून जाणारा गुटखा उदगीर शहरातील रिलायन्स पेट्रोलपंपा समोरुन महाराष्ट्र शासनाने प्रतीबंधीत केलेले अन्न पदार्थ व सुगंधित १८ खाकी कलर च्या पोत्या मध्ये ज्यात एक पोत्या मध्ये चार प्लास्टिकच्या बॅग असे एकुण ७२ बॅग प्रत्येक बॅग मध्ये ज्यावर केसरयुक्त विमल पान मसाला असे लिहलेले एक प्लास्टिकच्या बॅग मध्ये एकुन ५२ पुडे त्यांची किमंत ४ लाख ४९ हजार २८० रुपये व वी-१ तंबाखू किंग नाव असलेला १ लाख १२ हजार ३२० रुपयांचा असा एकुण ५ लाख ६१ हजार ६९० गुटखा व ७ लाख रुपयांची मारुती सुझुकी कंपनीची इर्टिगा कार असा एकुण १२ लाख ६१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल आपले कब्जात बाळगून वाहतुक करतांना मूदेमालासह मिळून आला. ज्ञानोबा ऊर्फ माउली मारोती गादेकर (रा. अकोली जि. परभणी) तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे हे करीत आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारतीयांनी निसर्गाचा लाभ घ्यावा

जगात तसे पाहिले तर निसर्ग हा मानवास म्हणजे जीवसृष्टीला भरपूर देतो ते ही विनामुल्य! त्याच्या बदल्यात मानव निसर्गाची परतफेड कमी प्रमाणात करतो किंवा करीत नाही. निसर्गनिर्मित बाब कोणती का असत नाही तसेच दुसरी विज्ञानाने तयार करू शकत नाही. हवा, पावसाचे पाणी, सुर्य आदि मानव दुसरा तयार करू शकत नाही. हवा कांही क्षणासाठी बंद पडली तर काय होईल? सुर्य उगावलाच नाही तर रोगराई वाढेल. डोंगर, झाडी हे आनादि काळापासून आहेत. झाड पहिल्यांदा मी लावले, आंबा मी लावला असे कोणी म्हणू शकत नाही कारण जेवढे फळ झाडे आहेत ते निसर्ग निर्मित आहेत. ते सतत आनादि काळापर्यंत राहाणार आहेत. पक्षी मोर असो किंवा कावळा पहिल्यांदा मी विज्ञानाने तयार केला असे कोणीही दावा करू शकत नाही. हे ईश्वर निर्मित आहे. ज्यांना वेदाचा अभ्यास आहे किंवा केला आहे त्यांना या बाबी कळून येतील. हा विषय विचार करायाला लावणार आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात या बाबीचा विचार, चिंतन व मनन केले पाहिजे. याचा कोणत्याही परिस्थितीत ऱ्हास होता कामा नये. हे ईश्वराने भरपूर दिले आहे व देत आहे. आपण परफेड न देता ऱ्हास करीत आहोत. नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी विचार पुर्वक काही बाबी केल्यातर निसर्ग भरपूर मानवाला, जीवसृष्टीला देवू शकेल. विचार करावा लागेल. रुग्णालयात जावा ऑक्सीजनचा मोबादला सेकंदला पैसा मोजावा लागतो. तसा वर्षानुवर्षे मोफत देणारा ऑक्सीजनचा आकार निसर्ग घेत नाही. टॅक्स कधी घेतला किंवा दिला का? मुळीच नाही. ऑक्सीजन तयार करणारा निसर्ग म्हणजे झाडे तोड अमाप होत आहेत. काही झाले तरी निसर्ग जीवसृष्टिची काळजी घेत असतो. झाडे तोडा, डोंगर फोडा, पाण्याची नासाडी करा तरी रागवत नाही. त्याच प्रमाणे मोबाईलचा वापर कशावरून होतो. या मोबाईलच्या धंद्यातून अमाप पैसा कमविणाऱ्या कंपन्या ह्या हवेला कर देतात का? केवळ हवेच्या लहरीवर मोबाईल चालतो. नेट चालते. बऱ्याच वेळा नेटवर्क नाही किंवा रेंज मध्ये नाही का म्हटले जात कारण तेथे हवा पोंहचत नाही. घराच्या छतावर जा किंवा मोकळ्या जागा मोबाईल, नेटला रेंज येते. असे का होते. हवेमुळे होते हे विज्ञानद्वारे मान्यच केले पाहिजे. निसर्गाचा पुरेपूर लाभ हा परदेशात घेतला जात आहे. निसर्गाने दिलेली प्रत्येक बाब ही जनतेसाठी वापरली जात आहे. त्यामुळे जनता खुश आहे कोणताही खर्च लागत नाही. आपल्यादेशात व परदेशात जो फरक आहे हे ओळखले पाहिजे. आज सौरऊर्जेचा वापर करा असे सांगितले जाते. सौर ऊर्जेचा उपयोग अनेक वर्षापासून चीन घेत आहे, आता कोठे भारताला जाग आली आहे. भारताला आता याचे महत्व कळाले आहे. भारताने यापुर्वीच विचार केला तर जनतेचे लाखो रूपये वाचले असते. आज मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर वीज निर्मितीस होतो ते पाणी सिंचनासाठी वापरले जावू शकते. खनीज पदार्थ कोळसा आहे. एक ना एक दिवस जमीनीच्या पोटातील संपत्ती संपणार आहे. किती दिवस जमीन आपल्या पोटातील संपत्ती देणार? याला मर्यादा आहेत. ही बाब तशी दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे ऊर्जा निर्मितीस सौर ऊर्जेचा वापर कसा करता येईल, यात वाढ कशाप्रकारे करता येईल, यात सुधारणा कशा प्रकारे करता येईल याचा विचार केला पाहिजे. आता कोठे अनेकांच्या घरावर सौर ऊर्जेचे प्लेटस् दिसत आहेत. आता कोठे या बाबत जनजागृती झाली आहे. होत आहे. आता काही प्रमाणात अल्प प्रमाणात जागृती होत आहे. वास्तविक सरकारने मोफत घर तेथे सौरऊर्जेच्या प्लेटा युनिट बसवुन दिले पाहिजे. नसता अतिषय अल्पदरात सौरऊर्जेचा यंत्रणा बसवावी लागेल. घर तेथे सौरऊर्जा प्लँट दिसला तर मोठ्या प्रमाणात इंधनाचा वापर होणार नाही. स्वयंपाकाचा गॅस एवजी सौरऊर्जावर चालणारी चुली दिल्या पाहिजेत. उष्ण कटीबंधात भारत देश येतो. भरपुर सुर्यप्रकाश मिळतो. उन्हाळ्यात वीजेची मागणे कितीतरी पटीने वाढते. त्याची कमतरता सौरऊर्जा भरून काढते. यामुळे वीजेचे भारनियमन करण्याची गरज भासणार नाही. भारतीय विचार करीत नाहीत. अविचाराने मोठे नुकसान होते. राज्यकर्त्यांनी विचार करावा की, जे निसर्गाने दिले आहे त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात देशातील जनतेसाठी कसा करता येईल? सध्याला सौरऊर्जानिर्मितीचे किट्स आहेत ते परवडणारे नाही. घरावर सौरऊर्जेसाठी प्लेटस बसवयाचे झाले तर लाखाच्यावर खर्च येतो, तो भारतातील जनसामान्यास परवडणारा नाही. जरी कर्जाची सोय असली तरी ते कर्ज फेडण्याएवढी ऐपत भारतीयात नाही. त्यामुळे सक्तीने घरोघरी सौरऊर्जेचा प्रकल्प मोफत बसवला पाहिजे. शासकिय स्तरावर तो राबविला पाहिजे. शासनस्तरावर जर सौरऊर्जेउत्पादनावर भर दिला तर कोळशाची बचत होणार आहे. पाण्याची नासाडी थांबणार आहे. कोयनेत बऱ्याच वेळा पाणी साठा कमी झाला किंवा कोळशाची कमतरता निर्माण झाल्यास वीजचे उत्पादन घटते. ही वस्तूस्थिती ओळखून मोठ्या प्रमाणात सौरऊर्जेचे किटस् घरोघरी सक्तीने बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही स्किम शंभर टक्के यशस्वी होणार नाही असे तरी वाटत असेल तर किमान पन्नासटक्के यशस्वी होणार आहे. त्यामुळे गौण खणीजची बचत होणार आहे. पाण्याची बचत होणार आहे. निसर्गाने भरपूर दिले आहे. आज रुग्णालयात जावुन रासायनिक गोळ्या पेक्षा अनेक फळात औषधी गुणधर्म आहे. अनेक फळे जीवनदायी आहे. फॉस्फरस, लोह, डीजीवनसत्व कमी असेल तर कोवळ्या उन्हात बसविले जाते. आदि शरिरातील कमरता फळे भरून काढू शकतात. या बाबीवर मनन किंवा चिंतन भारतीय करीत नाहीत. भारतीय आयुर्वेदाचा अभ्यास जगात केला जात आहे. त्यामुळे जे निसर्गाने भरपुर दिले आहे. त्याचा लाभ उठविला पाहिजे. त्याच प्रमाणे आज सर्वप्रथम एक-एक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. तो म्हणजे सौरऊर्जेचा आहे. याकडे जर गांभीर्याने पाहीले पहिजे. सरकारने केवळ सौरऊर्जासाठी शेतपंप, घरोघरी वीजेची निर्मितीसाठी सौरऊर्जाचे प्लँटची निर्मिती करावी, निसर्गाचा लाभ घेतला पाहीजे. यामुळे मोठी आर्थिक बचत होणार आहे.

# 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२५' निमित्त हनुमान मित्र मंडळाच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

## आरोग्य, स्वच्छता, कला व विद्यार्थी सहभागास उपक्रमातून प्राधान्य

**लातूर/प्रतिनिधी :** येथील अंबाजोगाई रोडवरील हनुमान मित्र मंडळाच्या वतीने 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२५' निमित्त दि. २८ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत हरिपाठ संकीर्तन, पखावज सोलो, अभंगवाणी, शालेय व महाविद्यालयीन स्पर्धा, स्वच्छता अभियान, आरोग्य शिबिर, दंत चिकित्सा व भौतिकोपचार शिबिर अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमाव्दारे समाजहिताचे भान ठेवत आरोग्य, स्वच्छता, कला व विद्यार्थ्यांचा सहभागास प्राधान्य असणार आहे.

नेत्रतज्ञ डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३१ वर्षापासून रामबाग येथे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. यावर्षी उत्सव श्रद्धेचा, संकल्प शाश्वततेचा या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२५' निमित्त गुरुवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंबाजोगाई रोड वरील रामबाग येथे प्रयाग कराड नर्सिंग कॉलेज व मुकुंदराज उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबवले जाणार आहे. त्याचबरोबर शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून नागरीकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता एम.आय.डी. एस.आर. दंत रुग्णालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय यांच्या वतीने दंत चिकित्सा व भौतिकोपचार शिबिर घेण्यात येणार आहे.

बुधवार, दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शालेय व महाविद्यालयीन स्पर्धा तर सायंकाळी ५ वाजता कैवल्य तेज मृदंग साधना गुरुकुल, रेणापूर यांचे हरिपाठ संकीर्तन होणार आहे. गुरुवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री गोपाळ जाधव व शिष्यवृंद नादब्रह्म पखावज अकादमी, लातूर यांचा पखावज सोलो व सायंकाळी ६ वाजता प्रा. कृष्णा हुमनाबादे, लातूर यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर या महोत्सवाचा समारोप शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता ह.भ.प. भागवताचार्य पूजाताई बडे यांच्या हरी किर्तनाने होणार आहे.

हनुमान मित्र मंडळाच्या गणेशोत्सवातील सामाजिक उपक्रमात स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष श्री सायस मुंडे यांनी केले आहे.

# "किमाया ब्युटी" स्किनकेअर ब्रँडचा शानदार कार्यक्रमात शुभारंभ

## नैसर्गिक उत्पादन असल्याने "किमाया ब्युटी" अल्पावधीत घराघरात पोहोचेल - आ.कराड




**लातूर/प्रतिनिधी :** उद्योग व्यवसायात केवळ शिक्षण घेऊन चालत नाही तर शिक्षणाबरोबरच कर्तृत्व असले पाहिजे. प्रामाणिकपणे कष्ट करण्याची जिद्द असली तर कोणत्याही उद्योग, व्यवसायात निश्चितपणे यश मिळते. किमाया ब्युटी हे स्किनकेअर नैसर्गिक उत्पादन असल्याने देशातच नव्हे तर परदेशातही किमया करू शकते, तसे झाले तर आपल्या माणसांचा अभिमान आणि स्वाभिमान यापेक्षा काय असू शकतो असे सांगून सर्व समाजात आणि समाजा समाजातील घराघरात हे उत्पादन अल्पावधीत पोहोचेल याची मला खात्री आहे असे प्रतिपादन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर येथील प्रसिद्ध उद्योजक जगदीश कुलकर्णी यांची कन्या कु. सानिका जगदीश कुलकर्णी यांनी नव्याने सुरू केलेल्या किमाया ब्युटी या स्किनकेअर ब्रँडचा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल कार्निवल येथे रविवारी सायंकाळी एका शानदार कार्यक्रमात शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध जेष्ठ विधीज्ञ श्री संजय पांडे, अभिनेत्री तन्वी मुदळे, सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड आणि उद्योजक जगदीश कुलकर्णी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती.



आई-वडिलांचे आशीर्वाद आणि जिद्दीने, कष्टाने काम करून जगदीश कुलकर्णी यांनी उद्योग क्षेत्रात आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. शिक्षण घेऊन नोकरी करण्यापेक्षा स्वतः एखादा उद्योग सुरू करून मालक होणे आणि इतरांना रोजगार उपलब्ध करून देणे हे महत्वाचे आणि गरजेचे आहे सानिका कुलकर्णी यांनी सुरू केलेला हा व्यवसाय निश्चितपणे शंभर टक्के यशस्वी होईल अशा शुभेच्छा यावेळी आ. कराड यांनी दिल्या.

लहान वयात सानिका कुलकर्णी यांनी स्किनकेअर उत्पादन क्षेत्रात मोठे धाडस केले असून किमाया स्किनकेअरच्या या उत्पादनात निसर्गातून येणाऱ्या साहित्याचा वापर असल्याने या व्यवसायाला अपयश येऊच शकत नाही अशी खात्री देऊन अभिनेत्री तन्वी मुदळे यांनी मराठवाड्याची माती जरी कोरडी असली तरी इथल्या माणसाच्या मनात जिव्हाळ्याचा आणि आपुलकीचा खूप ओलावा असल्याचे बोलून दाखविले. तर ज्येष्ठविधीज्ञ संजय पांडे यांनी या क्षेत्रात असलेली स्पर्धा लक्षात घेऊन यशस्वी होण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागतील दर्जा टिकवावा लागेल आणि वाढवावा लागेल असे सांगून या किमाया स्किनकेअर व्यवसायाची भरभराट होऊन लातूरचे नाव उंचवावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रारंभी किमाया ब्युटी स्किनकेअर या नैसर्गिक उत्पादनाबाबत सविस्तर माहिती उत्पादक कु. सानिका कुलकर्णी यांनी दिली कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश कुलकर्णी यांनी केले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत राहुल कुलकर्णी, सौ. साधना कुलकर्णी, दत्तात्र्य कुलकर्णी, सानिका कुलकर्णी, शमिका कुलकर्णी यांनी केले.

या कार्यक्रमास क्रिडाईचे अध्यक्ष उदय पाटील, दिपक कोटलवार, धर्मवीर भारती, विवेक रेड्डी, प्रवीण सरदेशमूख, अरूण समुद्रे, व्यंकट गर्जे, सुधीर धुतेकर, विक्रम शिंदे, नवनाथ भोसले, रविशंकर जाधव, सुरेश पेन्सलवार, उमेश कुलकर्णी, शुभदा रेड्डी, किशोर कुलकर्णी, गोपाळ जोशी, अभिजीत देशपांडे यांच्यासह उद्योग, व्यवसाय, सामाजिक, राजकीय यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी राहुल कुलकर्णी यांनी उपस्थित यांचे आभार मानले.

## हरितालिका उपवासासाठी खास:
## : शिंगाड्याच्या शेवयांची खीर :

श्रावण महिन्यात भरपूर उपवास, व्रतवैकल्य बऱ्याच लोकांची असतातच. पण नंतर लगेंच भादव्यातसुद्धा उपवास म्हटले की तेच ते साबुदाणा,भगरीचे पदार्थ खाण्याचा खूपच कंटाळा येतो. त्यात हवा पावसाळी, थंड पदार्थ नकोसे वाटतात, गौरी,गणपतीच्या आगमनांच्या तयारीचीही धामधूम



असते.अशावेळी झटपट बनवून पोटभरणारा, भरपूर एनर्जी देणारा,गरम गरम आणि खायलाही सोपा असा पदार्थ बनवावा वाटतो सर्वच गृहिणींना. हो ना? म्हणूनच आज आपण शिंगाड्याच्या शेवयांची झटपट बनणारी ,पौष्टिक,टेस्टी खीर बनवूया. या शेवया घरीही बनवू शकतो,पण बाजारात ही सहज मिळतात.

साहित्य:

१ वाटी शेवयांचा चुरा, २ चमचे साजूक तूप,
पाऊण लिटर दूध, ८..१० बदाम, पाव वाटी साखर, १ चमचा दुध मसाला, सजावटीसाठी केशर

कृती: या शेवया पांढऱ्याशुभ्र, नाजूक कुरडयासारख्या गोल तारांचे वेढे असलेल्या खूप सुंदर दिसतात. कडक असल्याने त्यांचा चुरा सहज बनवू शकतो. प्रथम बदाम पाण्यात

३..४ मिनिटे उकळून थंड पाण्यात टाकून त्यांची साले काढावीत. मग यांचे बारीक पातळ काप करावेत. गॅसवर कढईत दूध उकळायला ठेवावे. ते थोडेसे आटवून घ्यावे.त्यामुळे चवदार बनते. आता त्यात साखर, घालून दुधमसाला घालावा.
आणि पुन्हा मंद गॅसवर उकळत ठेवावे. दुसऱ्या बाजूला छोट्या कढईत तूप घालून ते गरम झाले की त्यात शेवया घालून मस्त तांबूस,गुलाबी रंगावर परताव्यात. या शेवया कुरडयांसारख्या मस्त फुलतात आणि हलक्या होतात. आता या उकळणाऱ्या दुधात घालाव्यात. पुन्हा उकळी आली की वाटीत थोडेसे गरम दूध घेऊन त्यात केशर घालून ते चमच्याने छान हलवून खिरीत घालावे व छान उकळली की खीर सर्व्हिंग बाऊलमध्ये काढून घ्यावी.सजावटीसाठी वरून पिस्ते,गुलाबपाकळ्या,आवडीचे ड्रायफ्रुट्स घालू शकतो.

वैशिष्ट्य:

उपवासाला साबुदाणा,तेलकट पदार्थ खाल्ले जातात.त्यामुळे पित्त वाढते,खूप त्रास होतो. पण या शिंगाड्याचे फायदे इतके आहेत की ते समजल्यावर सारेच बाकीचे पदार्थ सोडून ही खीरच खातील.
हे रोगप्रतिकारशक्ती वाढवणे, पचन सुधारणे, वजन कमी करण्यास मदत करणे आणि शरीरातील पाण्याची कमतरता पूर्ण करणे यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, शिंगाड्यामध्ये असलेले फायबर, व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स शरीराला आवश्यक पोषण देतात आणि विविध आरोग्य समस्या कमी करण्यास मदत करतात. फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्या दूर होतात.



वजन नियंत्रणात राहणे,हिरड्यांच्या समस्या दूर
थायरॉईड नियंत्रण करणे, लो ब्लडप्रेशरची समस्या दूर करते.असे आणि यापेक्षाही कितीतरी फायदे आपल्याला याच्या सेवनाने होतात. आपण याच्या पिठाची पण खीर याच पद्धतीने तुपावर भाजून केली तरी छान लागते. ज्यांना गोड नको असेल ते याचा तळून चिवडा किंवा उपमा सुद्धा करु शकतात. ते सुद्धा खूप टेस्टी बनतात शिवाय पोट सुद्धा लगेंच भरते. आता उपवास केले तरी आरोग्याची काळजी करण्याचे कारण नाही.

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.

# पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची ज्ञानप्रकाशमध्ये कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी :** इथे भरावी कला इथे विकासावे तंत्रज्ञान विज्ञानाच्या वाटेवरती ठेवू पर्यावरणाचे भान! या विचारांच्या सोबतीने मागील २६ वर्षांपासून ज्ञानप्रकाश, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे.

मागील काही वर्षांपासून ज्ञानप्रकाश मध्ये पर्यावरणपूरक गणपती मुर्ती बनवण्याची कार्यशाळा घेतली जाते . दरवर्षी मोठ्या संख्येने पालक, विद्यार्थी यात सहभागी होतात .



यावर्षीची मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा दि.२३ व २४ ऑगस्ट या दोन दिवसांमध्ये घेण्यात आली. या कार्यशाळेत ज्ञानप्रकाशची माजी विद्यार्थिनी इंटेरियर डिझायनर व आर्टिस्ट ,आर्किटेक्ट असलेली प्रा. साक्षी मल्लूरवारने लाल माती पासून गणपती बनवण्याचे प्रशिक्षण पालक आणि विद्यार्थ्यांना दिले. वेगवेगळ्या दोन गटातून पालकांसह लहान मुलेही यात उत्साहाने सहभागी झाली. .

या दोन दिवसांत जवळपास दोनशे गणपती मुर्ती तयार झाल्या . लाल माती पासून तयार हीच मुर्ती आता घराघरात स्थापन केली जाणार आहे .स्वतःच्या हाताने बनवलेल्या श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा आनंद कार्यशाळेत सहभागी झालेले प्रत्येक जण व त्यांचे कुटुंबीय घेतील . कार्यशाळेत मुलांसोबत आई व बाबा पालक दोघांचाही विशेष सहभाग, त्यांच्यामधील मूर्ती बनवत असतानाचा होणारा संवाद, एकमेकांशी सहचर्य, यातून एकापेक्षा एक सुबक, सुंदर आणि विलोभनीय अशा गणेश मूर्ती तयार झाल्या . आपली कला , संस्कृती आणि परंपरेशी नाळ जोडून रहावी यासाठी प्रकल्प सातत्याने प्रयत्नशील असतो . आपल्या सणवाराच्या पाठीमागील शास्त्र आणि हेतू लक्षात घेऊन , पर्यावरणाचे भान ठेवून , सजगतेने साजरे करणे गरजेचे असते .ज्ञानप्रकाशच्या या प्रत्येक सजग पावलासोबत ज्ञानप्रकाशशी जोडले गेलेले पालक आणि विद्यार्थीही तेवढ्याच आत्मियतेने प्रतिसाद देतात ही विशेष कौतुकाची बाब आहे . कला शिक्षक जयराम मस्के, विभाग प्रमुख माधवी मिरजकर, प्रकाश टिमके , प्रदिप शिंदे आणि इतर शिक्षकांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# झोपेतून उठताच भिजवलेल्या काळ्या मनुक्याचे पाणी प्यायलास ...



मधील 'मनुका' लहानपणापासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्याच आवडीचा आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या गोड पदार्थांमध्ये देखील आपण आवर्जून मनुका घालतो... ड्रायफ्रुटसमधील 'मनुका' लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्याच आवडीच्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या गोड पदार्थांमध्येदेखील आपण आवर्जून मनुका घालतो. दिसायला छोटा, पण शरीरासाठी भरपूर लाभदायक मनुक्याचे पाणीसुद्धा तितकेच फायदेशीर ठरते. दररोज सकाळी भिजवलेले काळ्या मनुकाचे पाणी प्यायल्याने तुम्हाला अनेक आरोग्य फायदे मिळू शकतात, कारण काळ्या मनुक्याचे पाणी जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असते; ज्यामुळे एकूणच आरोग्य सुधारण्यासाठी हा एक बेस्ट पर्याय ठरू शकतो.

तर याबद्दल तज्ज्ञांची सहमती घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने नोएडातील यथार्थ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील आहारशास्त्रप्रमुख आहारतज्ज्ञ सुहानी सेठ अग्रवाल यांच्याशी चर्चा केली आणि मनुक्याचे पाणी आपल्यासाठी फायदेशीर का आहे याबद्दल जाणून घेतले.

काळ्या मनुक्याचे पाणी पिण्याचे फायदे

१. पचन सुधारते - काळ्या मनुक्यात फायबर भरपूर प्रमाणात असतात, जे तुम्हाला पचनास आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करतात. काळ्या मनुक्याचे भिजवलेले पाणी प्यायल्याने शरीरात फायबर चांगले शोषले जातात; ज्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते आणि पचनसंस्थासुद्धा हेल्दी राहते.

२. ऊर्जा वाढण्यास मदत - मनुका साखर आणि कार्बोहायड्रेट्सचे नैसर्गिक स्रोत आहे; ज्यामुळे सकाळी शरीराला ऊर्जा देण्यास आणि तुमच्या चयापचयला सुरुवात करण्यास मदत करतात. याचबरोबर दिवसभर ऊर्जेची पातळी राखण्यास विशेषतः उपयुक्त ठरू शकतात.

३. लोह - भिजवलेल्या काळ्या मनुकाचे पाणी रक्त निरोगी ठेवण्यासाठी आणि अशक्तपणा येऊ न देण्यासाठी आवश्यक असलेल्या लोहाचे एक उत्तम स्रोत आहे. नियमितपणे या पाण्याचे सेवन केल्यास थकवा कमी होण्यास मदत होते; ज्यामुळे हिमोग्लोबिनची पातळी कमी असलेल्या व्यक्तींसाठी पाणी विशेषतः फायदेशीर ठरू शकते.

रोज सकाळी करा 'या' रसाचे सेवन; ५ त्रासांवर मिळवा आराम अनब जगा आयुष्य भरभरून

४. अँटिऑक्सिडंट्स - काळ्या मनुकामध्ये पॉलीफेनॉलसारखे अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण, जळजळ यांच्याशी लढण्यास मदत करतात. यामुळे एकूण आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होतो आणि वय वाढतानाही शरीर निरोगी राहण्यास मदत होते.

५. त्वचेच्या आरोग्याला आधार - काळ्या मनुकामध्ये आढळणारी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स निरोगी व चमकदार त्वचेला हातभार लावू शकतात. हे घटक शरीरातील मुक्त रॅडिकल्सशी लढतात आणि कोलेजन तयार होण्यास मदत करतात; ज्यामुळे त्वचा ताणते (एश्रींळल), ओलावाही टिकून राहतो आणि त्वचा निरोगी दिसते.

६. शरीर विषमुक्त राहते - भिजवलेल्या काळ्या मनुकाच्या पाण्यात शरीर विषमुक्त करण्याचे गुणधर्म असतात असे मानले जाते, यामुळे विषारी पदार्थ बाहेर काढण्यास, मूत्रपिंडाचे कार्य सुधारण्यास आणि यकृत स्वच्छ करण्यास मदत होते; ज्यामुळे एकूण आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.तुमच्या दैनंदिन दिनचर्येत भिजवलेल्या काळ्या मनुक्याच्या पाण्याचा समावेश करणे म्हणजे तुमच्या आरोग्याला दीर्घकाळासाठी मजबूत करण्याचा एक सोपा मार्ग आहे. सगळ्यात बेस्ट म्हणजे रात्रभर ८ ते १० काळे मनुके एक ग्लास पाण्यात भिजवा आणि सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा.

# भारताचा अद्भूत आणि प्रेरणादायी अंतराळ प्रवास




'राष्ट्रीय अंतराळ दिवस' केवळ भूतकाळातील यश साजरे करण्यासाठी नसून भविष्यातील विज्ञानप्रेमी पिढीला प्रेरणा देण्यासाठी आहे. या दिवशी देशभरातील शाळा, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि विज्ञान केंद्रांमध्ये विशेष कार्यक्रम, प्रात्यक्षिके, शिबिरे, व्याख्याने आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृत होते आणि त्यांना विज्ञान क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी प्रेरणा मिळते.

भारतात दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातील एक ऐतिहासिक टप्पा दर्शवतो. विशेषतः २०२३ मध्ये चांद्रयान-३ मोहिमेच्या माध्यमातून भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी पाऊल ठेवून जागतिक इतिहासात आपले नाव कोरले. या ऐतिहासिक यशाच्या सन्मानार्थ भारत सरकारने २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून जाहीर केला. आज २०२५ मध्ये हा दिवस संपूर्ण देशभर विविध उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

भारताचा अंतराळ प्रवास हा गेल्या काही वर्षांमध्ये झालेला एक अद्भूत आणि प्रेरणादायी प्रवास आहे. १९६० च्या दशकात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि तंत्रज्ञानाच्या अभावात सुरू झालेला हा प्रवास, आज आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या नेतृत्वाखाली अनेक यशस्वी मोहिमांपर्यंत पोहोचला आहे. १९६३ मध्ये केरळमधील थुंबा येथे पहिल्या रॉकेटचे प्रक्षेपण केले गेले आणि ते रॉकेटचा काही भाग सायकल आणि बैलगाडीतून नेऊन करण्यात आले होते. हे दृश्य आजही भारतीय अंतराळ क्षेत्राच्या संघर्षमय सुरुवातीची आठवण करून देते.

ऐतिहासिक घटना

१९७५ मध्ये भारताचा पहिला उपग्रह आर्यभट्ट रशियाच्या सहकार्याने अवकाशात पाठवण्यात आला. ही एक ऐतिहासिक घटना होती, कारण त्यानंतर भारताने मागे वळून पाहिले नाही. १९८० मध्ये इस्रोने एसएलव्ही-३ च्या माध्यमातून स्वदेशी रॉकेटद्वारे रोहिणी उपग्रह प्रक्षेपित केला. ही घटना भारताच्या अंतराळ स्वावलंबनाचा पाया होती.

नंतरच्या काळात इन्सॅट आणि आयआरएस (इंडियन रिमोट सेन्सिंग) या उपग्रह मालिकांनी भारतातील संप्रेषण, हवामान अंदाज, संसाधन व्यवस्थापन, कृषी संशोधन आणि आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवून आणली. २००८ मध्ये भारताने चंद्राच्या दिशेने आपली पहिली स्वतंत्र मोहीम चांद्रयान-१ यशस्वीरित्या पूर्ण केली. या मोहिमेद्वारे चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याचे अंश असल्याचे पहिले वैज्ञानिक पुरावे मिळाले. त्यानंतर २०१३ मध्ये भारताने मंगळ ग्रहाच्या दिशेने मंगळयान (मार्स ऑर्बिटर मिशन) ही आपली पहिली मोहीम पाठवली. याद्वारे भारत पहिल्याच प्रयत्नात मंगळाच्या कक्षेत यशस्वीरित्या पोहोचणारा पहिला देश ठरला. एवढेच नाही तर, ही मोहीम अतिशय कमी खर्चात यशस्वी करण्यात यश आल्यामुळे भारताच्या तांत्रिक क्षमतेचे जगभर कौतुक झाले. पुढे २०१९ मध्ये चांद्रयान-२ मोहीम काही तांत्रिक अडचणींमुळे अपूर्ण राहिली असली तरी त्यातील ऑर्बिटर आजही चंद्राच्या कक्षेत कार्यरत आहे. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी म्हणजेच २०२३ मध्ये भारताने इतिहास रचला. चांद्रयान-३ च्या माध्यमातून भारताचा 'विक्रम लँडर' चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरला. हे जगभरातले अशा प्रकारचे केवळ तिसरे यशस्वी लँडिंग होते. यामुळे भारताचे अंतराळ संशोधनातील स्थान मजबूत झाले.

विज्ञानप्रेमींना प्रेरणा

२०२५ मध्ये म्हणजेच चालू वर्षात अलिकडेच घडलेली एक विशेष घटना म्हणजे भारताच्या शुभांशु शुक्ला या अंतराळवीराने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाऊन विविध वैज्ञानिक प्रयोग केले. हे प्रयोग जैविक प्रक्रिया, अन्नप्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक्स आणि सूक्ष्मगुरुत्वाकर्षणाशी संबंधित होते. नुकतेच त्यांचे भारतात आगमन झाले. यावेळी लोकांनी केलेला जल्लोश आपण पाहिला. त्यांच्या नातलगांप्रमाणेच प्रत्येक भारतीयाने त्यांच्या परतण्याचे स्वागत केले. आपल्या अंतराळवीराने अंतराळात केलेल्या सगळ्या प्रयोगांचा उद्देश भविष्यातील दीर्घकालीन अंतराळ मोहिमांसाठी आवश्यक ज्ञान मिळवणे हा होता. भारताने अशा प्रकारच्या प्रयोगांमध्ये सहभाग घेतल्यामुळे आता देश स्वतंत्र अंतराळ स्थानक स्थापनेच्या दिशेने पावले टाकत आहे. ही सर्वात मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

थोडक्यात, 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' केवळ भूतकाळातील यश साजरे करण्यासाठी नसून भविष्यातील विज्ञानप्रेमी पिढीला प्रेरणा देण्यासाठी आहे. अंतराळ संशोधनाचा उपयोग केवळ अंतराळ मोहिमांपुरता मर्यादित नसून आपल्या दैनंदिन जीवनातही मोठ्या प्रमाणात होतो, हेदेखील या निमित्ताने आपण समजून घ्यायला हवे. उदाहरणार्थ, हवामान अंदाजासाठी वापरण्यात येणारे उपग्रह, शेतीसाठी जमिनीचे नकाशांकन, पूर आणि चक्रीवादळांसारख्या आपत्तींची पूर्वतयारीसाठी दिली जाणारी माहिती, टेलीमेडिसिन तसेच टेलीएज्युकेशनच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये सेवा पोहोचवणे हे सगळे इस्रोच्या कार्यक्षमतेमुळे शक्य होत आहे. आज आपले जीवन अधिक सुरक्षित, माहितीपूर्ण आणि कार्यक्षम करण्यामध्ये इस्रोचा मोठा वाटा आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्राची वाटचाल आता अधिक व्यापक दिशेने होत आहे.

स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर


आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'गगनयान' हे भारताचे पहिले मानवी अंतराळ मिशन लवकरच प्रक्षेपित होणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून भारत अंतराळात मानव पाठवणार्या मोजक्या देशांमध्ये सामील होईल. ही मोहीम पूर्णतः स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित आहे. याशिवाय खासगी स्टार्टअप कंपन्यांना अंतराळ संशोधनात सहभागी होण्यासाठी सरकारने काही संस्था स्थापन केल्या आहेत. यामुळे भारताची अंतराळ अर्थव्यवस्था बळकट होणार आहे. स्कायरूट एअरोस्पेस, अग्निकूल कॉसमॉस, पिक्सेल, बेलाट्रिक्स एअरोस्पेस यासारख्या कंपन्यांनी स्वदेशी रॉकेट्स, उपग्रह आणि नवतंत्रज्ञान विकसित करण्यास सुरुवात केली आहे.

या घडामोडींमुळे इस्रोवर असलेला भार कमी झाला असून त्याला आता संशोधन आणि नविन मिशन याकडे लक्ष केंद्रित करता येते.

काही संस्थांमार्फत खाजगी आणि सरकारी भागीदारी अधिक सशक्त होत आहे. यामुळे भारतात 'स्पेस इकॉनॉमी' म्हणजेच अंतराळ अर्थव्यवस्थेचा वेगाने विस्तार होत आहे. त्यामुळेच भविष्यात भारत हा केवळ अंतराळात मोहिमा राबवणारा देश न राहता जागतिक अंतराळ बाजारपेठेतील एक महत्त्वाचा खेळाडू बनेल, यात शंका नाही. भारताने आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे अनेक उपक्रम राबवले आहेत.

आपली इस्रो ही संस्था अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान यासारख्या देशांबरोबर शास्त्रीय सहकार्य करून विविध प्रकल्प यशस्वीपणे पुढे नेत आहे. यामुळे भारताला केवळ तांत्रिक फायदा झाला नाही तर जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह भागीदार म्हणून देखील ओळख मिळाली आहे. हे सगळे लक्षात घेता राष्ट्रीय अंतराळ दिवस हा केवळ एक सण नव्हे, तर भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचा आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेल्या पावलांचा गौरव आहे, हे प्रत्येक नागरिकाने ओळखायला हवे. भारताचे अंतराळ क्षेत्र हे भविष्यात अनेक संधींचे दार उघडणार आहे. हा फार मोठा प्रवास आहे आणि आजची पिढी या सगळ्याची साक्षीदार होत आहे. तेव्हा यातून प्रेरणा घेत अनेकांनी अभ्यास करावा आणि देशाच्या उज्ज्वल भविष्याला हातभार लावण्यासाठी सज्ज व्हावे हे उत्तम.-वैष्णवी कुलकर्णी

## पौष्टिक खा, फिट राहा! — डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)

## विनोद

सेक्सी ड्रेस घालन्यावर दंड लागणार, तर सेक्सी अदांवरही लागायला पाहिजे !



राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



## क्रीडा विश्व

# चेतेश्वर पुजाराची क्रिकेटमधून निवृत्ती घोषणा

### धैर्यशील आणि लवचीक क्रिकेटपटू

### टीम इंडियाची आणखी एक भिंत ढासळली




| प्रारुप | मैच | पारियां | रन | सर्वाधिक स्कोर | औसत |
|---|---|---|---|---|---|
| टेस्ट | 103 | 176 | 7195 | 206 | 43.61 |
| वनडे | 5 | 5 | 51 | 27 | 10.20 |
| IPL | 30 | 22 | 390 | 51 | 20.53 |

### १९ शतके, ३५ अर्धशतके आणि ३ द्विशतकांचा समावेश

मुंबई –महान फलंदाज राहुल द्रविड यांच्या नंतर जर भारताच्या कसोटी संघाची नवी मफभिंतफफ म्हणून कोणाला ओळखलं जात असेल, तर तो खेळाडू म्हणजे चेतेश्वर पुजारा. पण आता ही भिंतही ढासळली आहे. कारण, चेतेश्वर पुजाराने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आता तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटसोबतच व्यावसायिक घरेलू क्रिकेटमध्येही दिसणार नाही. चेतेश्वर पुजाराने भारतासाठी शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०२३ मध्ये खेळला होता. २०२३ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर त्याला भारतीय संघातून वगळण्यात आले.
चेतेश्वर पुजाराने सोशल मीडियावर पोस्ट करताना काय लिहिले?चेतेश्वर पुजारा याने सोशल मीडियावरून आपल्या निवृत्तीची घोषणा केली. त्याने एक भावनिक पत्र लिहिले आहे. त्याच्या कॅप्शनमध्ये त्याने लिहिले की, मफभारतीय जर्सी परिधान करणे, राष्ट्रगीत गाणे आणि प्रत्येक वेळी मैदानावर उतरताना आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करणं, या सर्व अनुभवांना शब्दांत मांडणे अशक्य आहे.
पुढे त्याने लिहिले की, पण म्हणतात ना, प्रत्येक चांगल्या गोष्टीचा एक शेवट असतो, आणि आता तो आला आहे.
मी भारतीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून संन्यास घेण्याचा निर्णय घेतला आहे.
आपणा सर्वांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद!चेतेश्वर पुजाराची कारकीर्द चेतेश्वर पुजाराने २०१० मध्ये भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून २०२३ पर्यंत त्याने १०३ कसोटी आणि फक्त ५ एकदिवसीय सामने खेळले. ५ एकदिवसीय सामन्यांमध्ये फक्त १५ धावा केल्या. तो २०१३ ते २०१४ पर्यंत या स्वरूपात खेळला. त्याला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कधीही संधी मिळाली नाही.
त्याच वेळी, चेतेश्वर पुजाराने १०३ कसोटी सामन्यांमध्ये ७१९५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये १९ शतके, ३५ अर्धशतके आणि ३ द्विशतकांचा समावेश आहे.
एका दशकाहून अधिक काळ, चेतेश्वर पुजाराला भारताच्या कसोटी संघाचा कणा म्हटले जात असे आणि अनेक प्रसंगी त्याने भारतीय संघाचा झेंडा उंचावला.

## फरीद हुसेनचा रस्ते अपघातात मृत्यू



### क्रिकेटविश्वात शोककळा

**नवी दिल्ली:** जम्मू- काश्मीरच्या क्रिकेटपटूला रस्ते अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे.
जम्मू आणि काश्मीरचा क्रिकेटपटू फरीद हुसेनचा रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा अपघात २० ऑगस्टला झाला होता. या थरारक अपघाताचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. हा क्रिकेटपटू आपल्या स्कूटीहून जात होता, इतक्यात अचानक कार चालकाने गाडीचं दार उघडल्याने त्याला धक्का लागला आणि तो जमिनीवर आदळला.
इंडिया टूडेने दिलेल्या वृत्तानुसार, फरीद हुसेनचा मृत्यू २० ऑगस्टला झाला आहे. मात्र, या भयानक अपघाताचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे. फावद हुसेन हा जम्मू- काश्मीरमधील स्टार खेळाडूंपैकी एक होता. मात्र, अचानक झालेल्या या अपघातामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. फरीद हुसेन जाणार इतक्यात कार चालकाने दार उघडलं त्यामुळे फरीद हुसेन जमिनीवर आदळला. तर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, एक पांढऱ्या रंगाची कार रस्तेच्या कडेला उभी आहे. त्यावेळी फरीद हुसेन आपल्या स्कूटीवरून जात होता. आधी कारचा दरवाजा बंद होता. पण जसं फरीद हुसेन जवळ पोहोचला, नेमकं त्याचवेळी कार चालकाने मागे कोणी आहे का, हे न पाहताच दार उघडला. त्यामुळे कारचा दरवाजा आणि फरीद हुसेनच्या स्कूटरची दोरदार धडक झाली. त्यामुळे तो आपल्या स्कूटीसह जमिनीवर आदळला. स्कूटरहून पडल्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. ही धडक इतकी जोरदार होती की, जमिनीवर आदळताच फरीद हुसेन बेशुद्ध झाला.
ही घटना घडल्यानंतर स्थानिकांनी धाव घेत फरीद हुसेनला दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी त्याला वाचवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र, शनिवारी त्याने जगाचा निरोप घेतला. पोलिसांनीही या घटनेचा तपास करायला सुरूवात केली आहे. मात्र या दुर्घटनेचं नेमकं कारण काय, हे व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



## आयपीएल चे माजी अध्यक्ष ललित मोदींचा जय शाह यांना धक्कादायक सल्ला

## वनडे क्रिकेट बंद करा..

**नवी दिल्ली:** आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी आयसीसीला वनडे क्रिकेट रद्द करण्याचा सल्ला दिला आहे. नेमकं काय म्हणाले? जाणून घ्या.
ललित मोदी यांनी इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेची सुरूवात केली. ही स्पर्धा जगातील सर्वात यशस्वी क्रिकेट लीग स्पर्धांपैकी एक आहे. या स्पर्धेने बीसीसीआयला मालामाल केलं. यासह अनेक दिग्गज खेळाडू देखील दिले. भारतीय क्रिकेटला वाट दाखवण्यात आयपीएलचा मोलाचा वाटा आहे. आता ललित मोदी यांनी वनडे क्रिकेट बंद करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यासह कसोटी क्रिकेटला डे-नाईट स्वरूपात खेळवण्यात यावं असा प्रस्ताव ठेवला आहे.ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्कला दिलेल्या मुलाखतीत ललित मोदी म्हणाले, ङ्ग जर तुम्ही दिवसा कसोटी क्रिकेट खेळवणार असाल, तर लवकरच कसोटी क्रिकेटचा शेवट होईल. माझ्या मते वनडे क्रिकेट बंद करायला हवं. कसोटी आणि टी-२० मालिकेची द्विपक्षीय मालिका व्हायला हवी. आता लोकं आधीसारखं मैदानात येऊन ८ तास बसू शकत नाहीत. त्यामुळे दररोज स्टेडियम भरणं कठीण आहे. माझ्या मते, कसोटी सामना दुपारी २ वाजता सुरू व्हायला हवा. यासह मायकल क्लार्कसोबत चर्चा करताना ललित मोदी यांनी आयसीसीला आणखी एक मोलाचा सल्ला दिला आहे. ते म्हणाले, ङ्गवर्ल्डकप स्पर्धेची संख्या कमी करायला हवी आणि ऑलिम्पिकवर लक्ष केंद्रित करायला हवं. दर ४ वर्षांनी वर्ल्डकप होतो. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचं संपूर्ण जगभरात आयोजन करायला हवं. वनडे वर्ल्डकपवर पैसा वाया

## फुटबॉलच्या बादशाहाचा अद्वितीय विक्रम; असे आतापर्यंत कोणालाही जमले नाही

नवी दिल्ली –फुटबॉल जगतातील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या क्रिस्टियानो रोनाल्डोने आणखी एक अनोखा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या पोर्तुगीज दिग्गजाने असा विक्रम केला आहे, जो आतापर्यंत कोणत्याही खेळाडूच्या नावावर नव्हता. चार वेगवेगळ्या क्लब आणि आपल्या देशासाठी १०० किंवा त्याहून अधिक गोल करणारा रोनाल्डो फुटबॉल इतिहासातील पहिला खेळाडू बनला आहे.रोनाल्डोनं केला १०० वा गोल : सौदी सुपर कपच्या अंतिम फेरीत अल नसरसाठी १०० गोल करण्याचा महान पराक्रम रोनाल्डोनं केला. मात्र या जेतेपदाच्या सामन्यात रोनाल्डोच्या संघाला अल अहलीविरुद्धच्या रोमांचक सामन्यात पेनल्टी शूटआउटमध्ये ३-५ असा पराभव पत्करावा लागला. निर्धारित वेळेपर्यंत सामना २-२ असा बरोबरीत राहिला.

# कांगारुंनी उभारला धावांचा हिमायल; तिसऱ्या वनडेत ३ फलंदाजांची शतके

मॅके –ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघात सुरु असलेल्या वनडे मालिकेतील तिसरा वनडे सामना ग्रेट बॅरियर रीफ अरेना मॅके इथं खेळला जात आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियानं या सामन्यात चांगली सुरुवात केली आहे. सलामीवीर ट्रेविस हेड आणि मिशेल मार्श यांनी पहिल्या विकेटसाठी २५० धावांची भागीदारी केली. विशेष म्हणजे २०२३ च्या विश्वचषकानंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या सलामीवीरांनी वनडे सामन्यात १०० पेक्षा जास्त धावांची भागीदारी केली आहे.



हेड आणि मार्श यांची तिसऱ्या वनडेत वादळी फलंदाजी : दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरु असलेल्या वनडे मालिकेत ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर आतापर्यंत फॉर्ममध्ये दिसत नव्हते. विशेषत: ट्रेविस हेडची बॅट अजिबात चालत नव्हती, परंतु या सामन्यात तो सुरुवातीपासूनच उत्तम फॉर्ममध्ये दिसत होता. या सामन्यात ट्रेविस हेड १४२ धावांवर बाद झाला. मार्श आणि हेडसमोर आफ्रिकन गोलंदाज असहाय्य दिसत होते. ऑस्ट्रेलियाच्या सलामीवीरांनी वनडे सामन्यांमध्ये गेल्या २३ डावांमध्ये १०० किंवा त्याहून अधिक धावांची भागीदारी केलेली नव्हती. ट्रॅव्हिस हेडशिवाय या सामन्यात कर्णधार मिचेल मार्शनंही १०६ चेंडूत १०० धावा केल्या, ज्यामध्ये ६ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. मार्शनं त्याच्या कारकिर्दीतील चौथं वनडे शतक झळकावलं.
२०२३ च्या वनडे विश्वचषकात झाली होती शतकी भागीदारी : यापूर्वी, ऑस्ट्रेलियाच्या सलामीवीरांनी शेवटच्या वेळी २०२३ च्या विश्वचषकात न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या विकेटसाठी १०० किंवा त्याहून अधिक धावांची भागीदारी केली होती. त्या सामन्यातही ट्रॅव्हिस हेडनं शतक ठोकलं होतं आणि १०९ धावा काढून बाद झाला. त्याच वेळी त्याचा साथीदार डेव्हिड वॉर्नरनं ६५ चेंडूत ८१ धावा केल्या होत्या. त्या सामन्यात दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १७५ धावांची भागीदारी झाली.
२२ वर्षांनंतर घडला पराक्रम : यासह २२ वर्षांनंतर असं घडलं आहे की, जेव्हा विरोधी संघाच्या दोन्ही खेळाडूंनी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे सामन्यात शतकं झळकावली आहेत. ट्रॅव्हिस हेड आणि मिचेल मार्श यांच्यापूर्वी इंग्लंडच्या व्ही. सोलंकी (१०६ धावा) आणि मार्कस ट्रेस्कोथिक (११४ धावा) यांनी २००३ मध्ये शतकं झळकावली होती. आता ऑस्ट्रेलियन सलामीवीरांनी २२ वर्षांच्या ऐतिहासिक विक्रमाची पुनरावृत्ती केली आहे.ऑस्ट्रेलियाने उभारला धावांचा हिमालय : या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर त्यांच्या सलामीवीरांनी आतापर्यंतच अपयस धुवून काढत पहिल्या विकेटसाठी २५० धावांची भागीदारी केली. यानंतर लागोपाठ दोन विकेट गेल्या. नंतर कॅमेरुन ग्रीन (११८ङ) आणि ॲलेक्स कॅरीनं (५०ङ) तिसऱ्या विकेटसाठी अवघ्या ८२ चेंडूत १६४ धावांची वादळी भागीदारी करत संघाला ४३१ धावांपर्यंत पोहोचवले.ट्रॅव्हिस हेडच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ८००० धावा : या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का ट्रॅव्हिस हेडच्या रुपात बसला. त्यानं १०३ चेंडूत १४२ धावांचा तडाखा दिला. या खेळीदरम्यान हेडनं १७ चौकार आणि ५ षटकार मारले. या दरम्यान, त्यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ८००० धावाही पूर्ण केल्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये, हेडनं आतापर्यंत १७७ सामन्यांच्या २१४ डावांमध्ये ४०.७३ च्या सरासरीनं ८०२४ धावा केल्या आहेत.

## चौथ्या दिवशी भारताचा पराभव



ब्रिस्बेन-ऑस्ट्रेलिया अ महिला क्रिकेट संघाने एकमेव अनधिकृत कसोटी सामन्यात भारत अ महिला संघाचा ६ विकेट्सने पराभव केला. हा सामना जिंकण्यासाठी भारत अ संघाने ऑस्ट्रेलिया महिला संघासमोर २८१ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे यजमान संघाने सामन्याच्या चौथ्या दिवशी सहज साध्य केले. या धावांच्या पाठलागात ऑस्ट्रेलिया अ महिला संघाच्या टॉप ऑर्डर फलंदाजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनिका लॉयडने संघासाठी सर्वाधिक ७२ धावा केल्या.
चौथ्या दिवशी टीम इंडियाचा डाव लवकर संपला : या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस भारताने ८ विकेट्स गमावून २६० धावा केल्या होत्या. चौथ्या दिवशी भारतीय संघाने येथून आपला डाव सुरु केला आणि २८६ धावा करुन सर्वबाद झाला. भारतासाठी राघवी बिश्तने या डावात सर्वाधिक ८६ धावा केल्या आणि तिच्याशिवाय शेफाली वर्माने ५२ धावांची खेळी केली. अशाप्रकारे, भारतानं ऑस्ट्रेलियासमोर २८१ धावांचे लक्ष्य ठेवले होते.
ऑस्ट्रेलियाच्या टॉप ऑर्डर फलंदाजांनी शानदार कामगिरी : २८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलियाने चौथ्या दिवशी चांगली सुरुवात केली. टहलिया विल्सन आणि राहेल ट्रेनामन यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावा जोडल्या. साईमा ठाकोरने भारताला पहिले यश मिळवून दिले, तिने टहलिया विल्सनला बाद केले. तिच्या बाद झाल्यानंतर राहेल ट्रेनामन देखील लवकरच बाद झाली, तिने ६४ धावा केल्या. यानंतर मॅडी डार्कनंही शानदार फलंदाजी केली आणि ६८ धावांचे योगदान दिले. परिणामी संघाने ८५.३ षटकांत ४ गडी गमावून २८१ धावांचे लक्ष्य गाठले.
पहिल्या डावात राघवी बिश्तनं केल्या होत्या ९३ धावा : या सामन्यात भारत अ संघाने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात २९९ धावा केल्या. त्या डावातही राघवी बिश्तने टीम इंडियासाठी सर्वाधिक ९३ धावा केल्या. बिश्तला दोन्ही डावात शतक पूर्ण करण्याची संधी होती, पण ती तसं करु शकली नाही. राघवी व्यतिरिक्त जोशिता व्हीजेनेंही ५१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाबद्दल बोलायचं झाले तर, पहिल्या डावात सिएना जिंजरनं शतक झळकावले आणि १०३ धावा केल्या. तिच्याशिवाय निकोल फाल्टमनं ५४ आणि ताहलिया विल्सननं ४९ धावांचं योगदान दिलं. ऑस्ट्रेलियानं त्यांच्या पहिल्या डावात ३०५ धावा केल्या आणि पहिल्या डावाच्या आधारे ६ धावांची आघाडी घेतली होती.

# छातीवर, हातावर, डोक्यावर चेंडूंचा मारा; वेदनेनं विव्हळला, पण अखेरपर्यंत लढला

मुंबई –भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू चेतेश्वर पुजारा याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट निवृत्ती घेतली आहे. सर्व प्रकाराच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त घेत असल्याचं चेतेश्वर पुजाराने सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले. चेतेश्वर पुजाराचे कसोटी क्रिकेटमध्ये मोठे योगदान राहिले आहे. २०१८-१९ मध्ये ऑस्ट्रेलियात पहिल्यांदा सिरीज जिंकण्यात चेतेश्वर पुजाराचा मोलाचा वाटा राहिला. चेतेश्वर पुजारा भारतासाठी भिंतीसारखा उभा राहिला. ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्स, जॉश हॅजलवूड, मिचेल स्टार्क या वेगवान गोलंदाजांनी धुमाकूळ घातला होता. यावळी चेतेश्वर पुजराने अनेक चेंडूंचे वार अंगावर झेलले. यावेळी त्याला गंभीर दुखापत देखील झाली. चेतेश्वर पुजारा मैदानात वेदनेने विव्हळत होता. परंतु मैदान न सोडता चेतेश्वर पुजारा भारतासाठी शेवटपर्यंत लढत राहिला.
ऑस्ट्रेलियात पहिल्यांदा सिरीज जिंकण्यात चेतेश्वर पुजाराचा मोलाचा वाटा-
२०१८-२०१९ साली बॉर्डर-गावसकर ट्रॉफीची स्पर्धा भारत आणि ऑस्ट्रेलियात खेळवण्यात आली होती. चार सामन्यांच्या या मालिकेत भारताने २-० असा विजय मिळवला होता. भारताने चेतेश्वर पुजाराच्या बळावर ॲडलेडमध्ये कसोटी सामना जिंकला तेव्हा तो एक अतिशय ऐतिहासिक क्षण होता. तब्बल १५ वर्षांनी ॲडलेड ओव्हलवर भारताने विजय मिळवला. यापूर्वी २००३ मध्ये ॲडलेडमध्ये भारताने



कसोटी सामना जिंकला होता. २०१८ मध्ये खेळल्या गेलेल्या ॲडलेड कसोटी सामन्यात चेतेश्वर पुजाराने भारताच्या पहिल्या डावात १२३ धावांची लढाऊ खेळी केली, ज्यामुळे टीम इंडियाने २५० धावांचा सन्मानजनक धावसंख्या उभारली. इतकेच नाही तर चेतेश्वर पुजाराने भारताच्या दुसऱ्या डावात ७१ धावांची मौल्यवान खेळीही खेळली. यामुळे भारताने विजय मिळवला. या सामन्यात चेतेश्वर पुजाराला 'सामनावीर' पुरस्कार मिळाला. ॲडलेड कसोटीचा नायक असलेल्या चेतेश्वर पुजारासाठी आशियाबाहेर हा पहिलाच 'सामनावीर' पुरस्कार होता. चेतेश्वर पुजाराची ही महान खेळी, जी कोणताही भारतीय विसरू शकणार नाही, अशी होती. तसेच ऑस्ट्रेलियाचे गोलंदाजांना चेतेश्वर पुजाराने अक्षरश: रडून सोडले होते.
चेतेश्वर पुजाराची कारकीर्द-
चेतेश्वर पुजाराने २०१० मध्ये भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून २०२३ पर्यंत त्याने १०३ कसोटी आणि फक्त ५ एकदिवसीय सामने खेळले. ५ एकदिवसीय सामन्यांमध्ये फक्त १५ धावा केल्या. तो २०१३ ते २०१४ पर्यंत या स्वरूपात खेळला. त्याला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कधीही संधी मिळाली नाही. त्याचवेळी, चेतेश्वर पुजाराने १०३ कसोटी सामन्यांमध्ये ७१९५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये १९ शतके, ३५ अर्धशतके आणि ३ द्विशतकांचा समावेश आहे. एका दशकाहून अधिक काळ, चेतेश्वर पुजाराला भारताच्या कसोटी संघाचा कणा म्हणून ओळखले गेले आणि अनेक प्रसंगी त्याने भारतीय संघाचा झेंडा उंचावला.

# भाजपा केंद्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्याकडून स्वागत

**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टीचे केंद्रीय सह संघटन मंत्री माननीय शिवप्रकाशजी हे लातूर दौऱ्यावर आले असता त्यांचे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने आ. रमेशअप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले.

भाजपाच्या जिल्हा कार्यालयात आयोजित पक्ष संघटनात्मक मंडल अध्यक्ष बैठकीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांनी विठ्ठलाची मूर्ती भेट देऊन सहसंघटनमंत्री मा. शिवप्रकाशजी यांचे स्वागत केले. यावेळी मा. शिवप्रकाशजी आणि आ. कराड यांच्यात पक्ष संघटनासह विविध विषयावर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, अरविंद पाटील निलंगेकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील, वसंतराव डिघोळे, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, प्रताप पाटील, सुरज शिंदे, उद्धव काळे यांच्यासह इतर अनेकजण होते.



## विद्यार्थ्याच्या प्रवासाला गोसावी वूमेन्स विंगच्या 'सायकल'मुळे गती, शैक्षणिक मदतीने गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य



**लातूर/प्रतिनिधी** : गोसावी वूमेन्स विंग या संस्थेने गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम शनिवार, दि. २४ ऑगस्ट रोजी हॉटेल अतिथी येथे पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा (मीरा) धर्मवीर भारती आणि उपाध्यक्षा अलका अंबादास गोसावी, अश्विनी दत्त पुरी, अंजली पुरी, संगीता गिरी, भाग्यश्री गिरी, प्रतिभा बन, सुजाता गिरी, मनीषा मोतीबुवा गिरी, डॉ.भागीरथी गिरी, संजना गिरी, छाया पुरी, सारिका गिरी, डॉ. प्रीती पुरी, रेखा गिरी, पार्वती भारती, मनीषा गोसावी, संध्या भारती, मनीषा पुरी, अश्विनी गिरी, रेणुका गिरी, सत्यभामा पुरी, अलका गिरी, अंजली गोसावी, आशा गिरी, मनीषा सागर, रोहिणी पुरी, सुरेखा गिरी यांच्या हस्ते ११ वी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या अश्विन फुलचंद गिरी या विद्यार्थ्याला सायकल देण्यात आली. यामुळे त्याच्या शिक्षणाच्या प्रवासाला गती मिळणार आहे तसेच इतर अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात आली.

संस्थेची सुरुवात केवळ १० महिलांनी केली होती, पण आज ती ६५ सक्रिय सदस्यांपर्यंत पोहोचली आहे. महिला सक्षमीकरण आणि समाजसेवेच्या ध्येयाने कार्यरत असलेली ही संस्था दरमहा समाजहिताचे कार्यक्रम आयोजित करते. संस्थेच्या या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी चालना मिळत आहे.

## एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा पगार गणेशोत्सवापूर्वी होणार..!- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्याप्रमाणे एसटीच्या सुमारे ८३ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचा वेतन गणपती उत्सवापूर्वी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीच्या कर्मचाऱ्यांचा पगार हा महिन्याच्या ७ तारखेपासून १० तारखेच्या दरम्यान होत असतो. परंतु यंदा गणपती उत्सव हा ऑगस्ट महिन्याच्या शेवटी आल्याने केवळ वेतनामुळे त्यांचे उत्सवाच्या आनंदावर विरजण पडू नये! म्हणून राज्य सरकारला एसटीच्या विविध सवलती पोटी ची प्रतिपुर्ती रक्कम लवकर देण्याची विनंती केली. त्यानुसार २५ ऑगस्ट रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, लवकरच एसटीच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बॅंक खात्यांवर त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन जमा होईल!

आपले सण-उत्सव साजरे न करता सर्वसामान्य प्रवासी जनतेसाठी अहोरात्र राबणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना यंदाचा गणेशोत्सव अतिशय उत्साहात आणि आनंदात साजरा करता यावा हीच सदिच्छा.

एसटीच्या सर्व अधिकार व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना गणपती उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा..!

## सेंच्युरी मिलची जागा गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळण्याचा मार्ग मोकळा

**मुंबई/प्रतिनिधी** : वरळी येथील सेंच्युरी मिल मधील ४८८८.७८ चौ.मी.जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी सीमांकन करून सुद्धा, वाडिया आणि सेंच्युरी मिल व्यवस्थापन यांच्या वादामुळे सेंच्युरी कामगारांच्या घरासाठी मिळत नव्हती. हा वाद मिटल्यामुळे, या जागेची मागणी केल्याने नुकत्याच मॉनेटरी कमिटीत झालेल्या सुनावणीमध्ये ही जागा घरासाठी सेंच्युरी मिल व्यवस्थापनाने देण्याची तयारी दर्शवली आहे.

गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रवीण घाग हे गेले १२ वर्ष ही जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी मिळावी म्हणून मॉनेटरी कमिटीकडे दाद मागत आहेत. नुकताच नसली वाडिया आणि सेंच्युरी मिल व्यवस्थापनाचा या जागेसंबंधी असलेला वाद मिटला आहे. हे समजताच प्रवीण घाग आणि सेंच्युरी एकता मंचचे अध्यक्ष नंदू पारकर व जितेंद्र राणे यांनी यासंबंधी या सुनवणीवेळी हा प्रश्न उपस्थित केला आणि ही जागा मिळावी म्हणून जोरदार मागणी केली.

## नव्याने रजिस्टर,पार्सल, स्पीड पोस्ट काउंटर सुरू करण्याची आम्ही लातूरकर युवक कृती समितीची मागणी



**लातूर/प्रतिनिधी** : लातूर दिनांक २५.०८.२०२५ रोजी श्री श्रीकांत जा माने सहाय्यक डाक अधिक्षक, धाराशिव विभाग, मुख्यालय लातूर यांची भेट घेऊन रजिस्टर, पार्सल, स्पीड पोस्ट करण्यासाठी नव्याने काउंटर चालू करण्याची मागणी आम्ही लातूरकर युवक कृती समितीच्या शिष्टमंडळाद्वारे करण्यात आली आहे

मुख्य पोस्ट कार्यालय गांधी चौक अंतर्गत सकाळी १०.३० ते दुपारी ४ पर्यंत तर तळ मजल्यावरील काउंटर दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत चालू असते या वेळेत अनेक ग्राहक, व्यापारी , विधिज्ञ, विद्यार्थी, पालक नागरिक रजिस्टर, पार्सल,स्पीड पोस्ट करण्यासाठी आलेले असतात ज्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते त्यामुळे अनेकदा तासनतास ग्राहकांना रांगेत उभे राहावे लागते आहे तसेच रांगेत थांबून काउंटर वर पोहोचल्यास कर्तव्यावर असलेले कर्मचारी एक किंवा दोनच पार्सल घेतात जास्तीचे असल्यास स्वीकारत नाहीत व बेजबाबदार पणे ग्राहकांशी वागतात असे ग्राहकांशी वागणे बेजबाबदार पनाचे आहे त्यामुळे ग्राहक, विधिज्ञ, व्यापारी, विद्यार्थी, पालक, नागरिकांच्या सोयीसाठी नव्याने काउंटर सकाळच्या व दुपारच्या सत्रासाठी सुरू केल्यास ग्राहक नागरिकांची गैरसोय दूर होऊन सोय होण्यास मदत होईल नव्याने काउंटर सुरू करण्यासाठी संबधिताना सूचित करण्याची मागणी आम्ही लातूरकर युवक कृती समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे यावेळी अँड प्रदिपसिंह गंगणे , अँड रोहन गंडलें, अँड किशोर शिंदे, मुन्ना हाश्मी, अँड कलीम मणियार,अतिश कांबळे, महमद कांबळे,ताहेरभाई सौदागर अजिजभाई बागवान, अँड सतिश पतंगे,करीम तांबोळी, वजाहद पटेल आदींची उपस्थिती होती

## गणेशोत्सव काळात वाहतूक नियमांविषयी जनजागृती मोहीम राबवा - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### रस्ते सुरक्षा समिती बैठकीत विविध विषयांवर चर्चा




**लातूर/प्रतिनिधी** अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असून, याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आगामी गणेशोत्सवात वाहतूक नियम जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. थोरात, कार्यकारी अभियंता देवेंद्र नीळकंठ, अलका डाके, गणेश क्षीरसागर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

गणेशोत्सव काळात लातूर शहर महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी संयुक्तपणे वाहतूक नियमांविषयी जनजागृती मोहीम राबवावी. गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने प्रमुख ठिकाणी वाहतूक नियमांचे प्रबोधन करणारे देखावे आणि फलक लावण्याचे प्रयत्न करावेत. तसेच, जिल्ह्यातील सर्व रस्त्यांवर वेग मर्यादा, वळण रस्ते यांचे दिशादर्शक फलक योग्य ठिकाणी लावावेत. लातूर शहरातील प्रमुख चौकांतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी, वाहतूक पोलीस आणि महानगरपालिका यांनी संयुक्त बैठक घेऊन लवकरात लवकर उपाययोजनांचा आराखडा सादर करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर गतिरोधक बसवण्याची आवश्यकता अधोरेखित केली. रस्त्यांवरील दुभाजकांवर वाढलेली झाडे आणि झुडपे वाहतुकीला अडथळा ठरणार नाहीत यासाठी उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले. तसेच, लातूर आणि हरंगुळ रेल्वे स्थानकांवर रेल्वे आल्यानंतर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

या बैठकीत लातूर शहरातील रिक्षा थांबे आणि महामार्गावरील दिशादर्शक फलक आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

## श्री केशवराज विद्यालयात पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न




**लातूर/प्रतिनिधी** : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळा संपन्न करण्यात आली. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे हे चौदावे वर्ष असून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहने सहभाग घेतला. विद्यालयात नेहमीच पर्यावरणपूरक हा विषय घेऊन समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना अशा उपक्रमाद्वारे जागतिक पर्यावरणाचे संतुलन कसे राखावे, जागतिक पर्यावरणाचा होणारा ऱ्हास याविषयी जागृती अशा विविध विषयावरती मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करण्याचा आग्रह केला जातो. या पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अनिल वारद (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पर्यावरण गतिविधि,लातूर जिल्हा,संयोजक ) तसेच विनोद जाधव (कलाकार तथा पर्यवेक्षक, रेनीसन्स सीबीएसइ स्कूल, लातूर ), विशेष उपस्थिती एस. के. बोराळे (पर्यावरण गतिविधि, शिक्षण विभाग,लातूर) आणि पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, पर्यवेक्षक राम जोशी, विस्तारसेवा कार्य समिती संस्था प्रमुख जितेंद्र जोशी, चित्रकला शिक्षक व्यंकटेश माने यांची उपस्थिती होती.

ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना मोफत घेण्यात आली. विद्यार्थ्यांना शाळेमार्फतच माती वितरित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विद्येचे आराध्य दैवत श्री गणेशाच्या मूर्तीला आकार देण्यास प्रारंभ करताना प्रमुख पाहुणे अनिल वारद यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक वस्तूंचे महत्व पटवून दिले. प्रमुख पाहुणे विनोद जाधव यांनी विद्यार्थ्यांना गणपती तयार करण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर केले. याप्रसंगी शाळेचे चित्रकला शिक्षक धम्मानंद लांडगे यांनीही विद्यार्थ्यांसमोर प्रात्यक्षिक सादर केले.

याप्रसंगी शाळेचे केशवराज माध्यमिक विद्यालय, शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर यांनी कार्यशाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांनी केलेल्या गणपती मूर्तीचे कौतुक केले. याप्रसंगी विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यंकटेश माने, धम्मानंद लांडगे तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पोलीस प्रशिक्षण केंद्रात करण्यात आले गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी** :एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स या उपक्रमांतर्गत लातूर येथील बाभळगाव पोलीस प्रशिक्षण केंद्रात सीडीएसएल आयपीएफ तर्फे आयोजित गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले.सशस्त्र दलातील जवान, पोलीस कर्मचारी, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना गुंतवणूक सजग निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, आर्थिक स्वावलंबनाची जाणीव त्यांच्यात वाढवणे आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यात त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.या प्रसंगी भांडवली बाजारातील मूलभूत संकल्पना, 'डिपॉझिटरीज'ची भूमिका तसेच प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) व दुय्यम बाजार यांमध्ये आवश्यक ती छाननी करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. महत्त्वाच्या आर्थिक संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी तज्ज्ञांनी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांचा वापर केला. कार्यक्रमात गुंतवणुकीची मूलभूत तत्त्वे आणि गुंतवणूक फसवणुकीपासून बचाव यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. सीडीएसएल आयपीएफ संपूर्ण देशभर आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी आणि गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम राबवण्यासाठी कटिबद्ध असून, प्रत्येक व्यक्तीला आत्मनिर्भरगुंतवणूकदार होण्यासाठी सक्षम बनवीत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानामुळेच देश एकसंघ

## जेष्ठ विधिज्ञ ॲड. प्रा.बी.व्ही. मोतीपवळे यांचे प्रतिपादन



**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग, लातूर तथा लातूर जिल्हा वकील मंडळ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा वकील मंडळाच्या सभागृहात 'भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानापुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. वाय. डी. जगताप यांची उपस्थिती होती. तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. जांबुवंतराव सोनकवडे, विशेष सरकारी वकील ॲड. लक्ष्मण एन शिंदे हे मंचावर उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा वकील मंडळाच्या उपाध्यक्षा ॲड. मनीषा दिवे पाटील,सहसचिव ॲड.निलेश मुचाटे,कोषाध्यक्ष ॲड. गणेश कांबळे आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

मंचावरील सर्व मान्यवरांचा सत्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी त्याकाळी संसदेत केलेले भाषण त्याच्या प्रती आणि बुके देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सदस्य ॲड. राजेंद्र लातूरकर यांनी केले.

याप्रसंगी मंचावर प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ विधिज्ञ ॲड. प्रा.बी.व्ही. मोतीपवळे यांची उपस्थिती होती. व्याख्यानाच्या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानामुळेच देश एकसंघ असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विधिज्ञ ॲड. प्रा.बी. व्ही. मोतीपवळे यांनी केले.

पुढे बोलताना जेष्ठ विधिज्ञ ॲड. प्रा.बी. व्ही. मोतीपवळे यांनी संविधान सभेची निर्मिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानाप्रती असलेले योगदान हे अत्यंत महत्वपूर्ण होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच एकमेव शिल्पकार असल्याचेही त्यांनी सांगितले तसेच संविधानाने दिलेले मूलभूत हक्क अधिकार व मार्गदर्शक तत्वे यावर प्रकाश टाकला व आजच्या परिस्थितीमध्ये ते कायम राहणे काळाची गरज असल्याचे सांगितले. भारताचे संविधान सर्वश्रेष्ठ आहे व यामुळेच देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता, प्रेम आणि न्याय टिकून आहे आणि ते कायम चिरकाल राहावे यासाठी सर्वांनी जाती, धर्म, पंथ, भाषा वर्ण विरहित तसेच एकमेकांचा द्वेष न करता एकजुटीने राहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजसुधारक, अर्थतज्ञ, पत्रकार, कायदेपंडित, तत्वज्ञानी, विचारवंत, साहित्यिक, विद्यार्थी असे बहुआयामी महापुरुष होते त्यांचे देशाप्रती असलेल्या योगदानाबद्दल येथील प्रत्येक भारतीयांनी समरण केले पाहिजे अशीही मांडणी केली.

आज देशात जात, धर्म, भाषा, स्वातंत्र्य यावरून निर्माण होत असलेली परिस्थिती अत्यंत चिंताजनक तसेच भीतीदायक आहे यासाठी संविधानिक मार्गानेच यावर मात करणे हा एकमेव उपाय आहे आणि यामाध्यमातूनच आपला भारत देश सुजलाम सुफलाम देश बनविणे हे आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय संविधानाची निर्मिती करीत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली नाही त्यांनी संविधान निर्माण करण्यास प्रथम प्राधान्य दिले यामुळेच ते किती महान व्यक्तिमत्व होते हे यावरून सिद्ध होते असेही मत ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. बी. व्ही.मोतीपवळे यांनी व्यक्त केले.

आम्ही भारताचे लोक या ब्रीद वाक्यापासून त्यांनी संविधानाची सुरुवात केली यावरूनच त्यांची महती आणि देशभक्ती प्रकट होते असेही मत व्यक्त केले.

कार्यक्रमात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. शिवकुमार बनसोडे, ॲड. राम केंद्रे, ॲड.अभय खानापुरे, ॲड. बी. ई कवठेकर,ॲड. देविदास बोरुळे पाटील, ॲड. प्रवीण पाटील, ॲड. प्रदीप गायकवाड, ॲड. प्रशांत गायकवाड, ॲड. कल्पना भुरे, ॲड. गायत्री नल्ले, ॲड. चिंते मॅडम, ॲड. भोसले मॅडम, ॲड.राम गजधने, ॲड. सिद्धेश्वर धायगुडे, ॲड. गुरुसिद्ध मिटकरी, ॲड. सविता मोतीपवळे, ॲड. विश्वजीत पाटील ॲड. संजय कांबळे, ॲड. अजय कलशेट्टी, ॲड.नितीन लोभे, ॲड. गोपाळ रेड्डी, ॲड. सिद्धार्थ दंडे, ॲड. प्रवीण कांबळे, ॲड. प्रीतम कांबळे, ॲड. दीपक माने, ॲड. श्रीकांत मोमले, ॲड. राहुल कांबळे आदी विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. सचिन डी. कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन ड.शिवकुमार एम बनसोडे यांनी केले.

### विद्यार्थी गणेश मंडळांच्या अध्यक्षपदी-आर्यन पंडित यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** मोती नगर भागातील विद्यार्थी गणेश मंडळाची बैठक रेनबो प्रि इंग्लिश स्कूल मध्ये संपन्न झाली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सौ अश्विनी तेलंगे या होत्या. या मंडळाच्या अध्यक्षपदी आर्यन पंडित ,उपाध्यक्षपदी कुणाल हिप्परगेकर, कोषाध्यक्ष विवेक लोकरे, सचिव विराज सिरसाठ, सहसचिव स्वराज गायकवाड, चिटणीस व्यंकटेश मोरे, सरचिटणीस रियांश शिंदे, स्पर्धा प्रमुख मोक्ष कदम तसेच सदस्य पदी शांभवी पवार, वेदांत दुधाळे, प्रणाली कांबळे, हिंदवी पवार आदींची निवड करण्यात आली त्या निवडीबद्दल प्रा.गिरीधर तेलंगे, खुशी तिवारी, मोहिनी साळुंखे, वैशाली सोमवंशी, अनिता चिंताले आदींनी अभिनंदन केले आहे

## नैसर्गिक आपत्तीच्या काळात कृषी विभागाचा कारभार 'रामभरोसे'

### कृषी विभागाचे अधिकारी अन् कर्मचारी 'मुख्यालयी' नाहीच
### निलंग्याचा कृषी विभाग असून अडचण नसून खोळंबा

**निलंगा(आयुब बागवान):** गेल्या कांही दिवसापासून तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे खरिप हंगामातील उडीद, मूग, तूर यासह सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या क्षेत्राची माहिती देण्यासाठी शेतकरी कृषी कार्यालयाला खेटे घालत आहेत मात्र नैसर्गिक आपत्तीच्या काळात अधिकारी व कर्मचारी 'मुख्यालयी' राहत नसल्याने तालुका कृषी विभागाचा कारभार 'रामभरोसे' झाला आहे. कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर शेतकऱ्यांकडून मिश्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्याचे कार्यक्षेत्र मोठे असून १६२ महसुली गावाचा समावेश आहे. यंदा मृग नक्षत्रात पेरणी झाल्यामुळे सोयाबीनसह खरिप हंगामातील पिकांची परिस्थिती समाधानकारक आहे. मात्र गेल्या आठ दिवसांपासून तालुक्यातील विविध भागात चांगला पाऊस झाला आहे तर काही महसुली मंडळात अतिवृष्टी झाली आहे. निटूर महसूल मंडळात तर १२० मिलिमीटर पाऊस झाला आहे. तालुक्यातील मांजरा व तेरणा या दोन्ही नद्या भरून वाहत आहेत. अतिवृष्टीच्या काळात सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने दिले असतानाही कृषी विभागाचा कारभार मात्र रामभरोसे झाला आहे. या कार्यालया अंतर्गत तीन मंडळ कृषी कार्यालय असून प्रत्येक मंडळाला दोन सुपर वायझर व प्रत्येक सपर वायझरच्या अधिकाराखाली सहा असिस्टंट (कृषी सहायक) आहेत मात्र कोणतेही अधिकारी अथवा कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. कृषी विभागाच्या कार्यालयीन कामकाजाच्या रचनेत क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी व कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी असे दोन विभाग असले तरी क्षेत्रिय कर्मचारी बहूतांश वेळा ना क्षेत्रावर ना..शेतावरती दिसत नाहीत.. ना.. कधी तालुका कृषी कार्यालयात दिसत नाहीत अशी स्थिती सध्या तालुक्यात निर्माण झाली असून तालुका कृषी अधिकारीच मुख्यालयी राहत नसल्यामुळे व त्यांचा कर्मचाऱ्यांवर कोणताही धाक नसल्याने शेतकऱ्यांची मात्र हेळसांड होतांना दिसत आहे.

तालुका कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी प्रभावी काम करत नसल्याच्या तक्रारी असून शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढवणे, कृषी योजना राबवणे, माहिती देणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात नुकसान झालेल्या पिकाची माहिती कळवणे असे असतानाही पदभार असलेल्या एखाद्या गावात जावून भेट घेणे, त्यानंतर गायब होणे असे प्रकार दिसत आहे. तीन-चार गावचा पदभार असल्याने अधिकारी, कर्मचारी कोणत्या गावात आहेत हे निश्चितपणे दिसून येत नाही. केवळ कागदोपत्री दौरै दाखवून वरिष्ठांची फसवणूक केली जात असल्याचे दिसत आहे.

**कोण विचारणार?**

तालुका कृषी अधिकारी हेच मुख्यालयी राहत नाहीत तर त्यांच्या अधिन काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे काम विचारण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही सध्या पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पीक विमा अथवा नुकसानी बाबत शेतकरी कार्यालयात खेटे घालत आहेत मात्र तेथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कोणीही भेटत नसल्यामुळे नाईलाजाने त्यांना परतावे लागत आहे

**छावा स्टाईलने पंचनामा करू :**

सध्या शेती पिकाचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून अधिकारी अन् कर्मचारी त्यांचे कागदोपत्री दौरै दाखवून खासगी कामात व्यस्त दिसतात थोडावेळ थांबायचे हजेरी लावायची मिटींग आहे म्हणून गायब व्हायचे असा प्रकार सर्रास सुरू आहे त्याचबरोबर कार्यालय कुठे आहे याचा पत्ताही शेतकऱ्यांना लागत नाही त्यामुळे यापुढे शेतकऱ्यांच्या कामात हलगर्जीपणा केला तर छावा स्टाईलने पंचनामा करू असा इशारा तालुकाध्यक्ष तुळशीदास साळूंके यांनी दिला आहे.

**नाथराव शिंदे : तालुका कृषी अधिकारी**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिका संदर्भात तहसीलदार यांनी पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत लवकरच तलाठी व कृषी सहायक पंचनामे करतील जे कृषी सहायक कुचराई केल्या नंतर तक्रार प्राप्त होताच त्यांच्यावर कारवाई करू

### तालुक्यात फळबाग, भाजीपाला लागवडीसाठी विशेष प्रयत्न करणार: ढाकणे

**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** तालुक्यात फळबाग व भाजीपाला लागवडीकडे विशेष लक्ष देऊन फळबाग वाढवण्याचे ध्येय ठेवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी संजय ढाकणे यांनी केले. तालुका कृषी कार्यालय शिरूर अनंतपाळ यांच्या वतीने बाकली येथे आयोजित जिल्हास्तरीय मासिक चर्चा क्षेत्र व प्रक्षेत्र भेटी कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी कृषी महाविद्यालयाचे डॉ. वसंत सूर्यवंशी, मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. सचिन दिग्रसे, तालुका कृषी अधिकारी निलंगा नाथराव शिंदे, लातूरचे प्रमोद राठोड, चाकूरचे शिवचंद्रपाल सिंह जाधव, औसाचे दत्तात्रय हाके यांची प्रमुख उपस्थित होते. या प्रक्षेत्र भेटीमध्ये थेरगाव येथील हरिश्चंद्र चामले यांचे सोयाबीन टोकन, गुंडेराव सांगवे शिरूर अनंतपाळ यांचे पेरू लागवड, जनार्दन नरहरे भिगोली येथील आंबा लागवड, नागनाथ जाधव बिबराळ यांची बीबीएफ सोयाबीन प्लॉट, चरण सिंग राठोड यांची करटोली शेती प्रक्षेत्र भेटीचा समारोप वाकली येथील प्रगतीशील युवा भाजीपाला लागवड शेतकरी सोमनाथ देविदास चित्ते यांच्या शेतामध्ये प्रक्षेत्र भेटीची सांगता झाली.या प्रक्षेत्र भेटी दरम्यान सोयाबीन तूर मूग उडीद ऊस तसेच फळबाग,भाजीपाला, सोयाबीन व आंतरप्रवाही कीटकनाशक याविषयी मार्गदर्शन केले.


टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


### डी जे ..

डीजेभितो शपथेला
आवाज वाढे भरारा
डेसिबल चिंता नाही
वर चढतो तो सरारा

टाप कुणा बोलाया
केवढा असा दरारा
फाटू दे कानी पडदे
पिटा जोरात नगारा

विकत घेऊन यंत्रणा
कायदेनियम झुगारा
उत्सव असो कुठला
वाढता वाढे पसारा

नादमाझा करूनका
देई मस्तवाल इशारा
दण दणाण दणका
अंगावर येतो शहारा

असे वागणारं आम्ही
वाढवा किती पहारा
आबाल वृद्धांना त्रास
स्वभाव गुंडा आवारा

नेहमी चाले महोत्सव
उभा केलायं डोलारा
सवय ती कांगाव्याची
थुई थुई नाचे फवारा

अरे दुजा विचार करा
काय त्रास हो विचारा
सत्व जाणा उत्सवाचे
जरा आवरा दुर्विचारा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

### झिंगणप्पा स्वामी दिंडी सप्ताहाच्या संयोजकपदी प्रा.विश्वनाथ स्वामी राडीकर तर सह संयोजकपदी मन्मथ बिडवे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** चौदाघर मठ देवस्थान संस्थानची झिंगणप्पा स्वामी दिंडी व सप्ताहाच्या संयोजक ,सहसंयोजक पदाच्या निवडीस संदर्भात सर्व सदश्य व विश्ववस्तांच्या उपस्थितीत रविवार दिनांक २३/८/२०२५रोजी सकाळी ११:००वा बैठकहोऊन सर्वानुमते संयोजक पदी श्री प्रा.विश्वनाथ स्वामी तर सहसंयोजक पदी मन्मथ बिडवे यांची निवड करण्यात आली.





सन २०२५-२६सालच्या दिडी सप्ताहाची रुपरेषा आखणी,सप्ताहात विविध भजनी मंडळ व गायक मंडळाची निवड करणे,दिंडी मिरवणुक संदर्भात चर्चा,विविध ग्रुपकडुन महाप्रसाद संदर्भात चर्चा करण्यात आली, दिंडी निमीत्ताने परगावच्या भजनीमंडळास निमंत्रीत करणे,आदीवर विश्ववस्ता सोबत विचार विनमय करण्यात आला.दिंडीव सप्ताहात सर्वानीच तन,मन,धनांनी सहकार्य करुन दिंडी सप्ताहा यशस्वी पारपाडावा असे आवहानही करण्यात आले.

नुतन संयोजक,सहसंयोजक व विश्वस्त,अध्यक्ष गंगाधर मंठाळे उपाध्यक्ष विजयकुमार चोळखणे,सचिव श्रीशैल्य सिध्देश्वरे,कोषाध्यक्ष बाबुअप्पा वाघमारे, सिद्रामप्पा औरादे, बसवप्पा सोलापुरे, राजकुमार झिपरे, औदुंबर मंठाळे महेश कलेमले, दत्ता बसपुरे, धुळप्पा जयशेटे, चौदाघर मठ युवक भजनी मंडळ, चौदाघर मठ महीला भजनी मंडळ व आप्पा गणेश मंडळाचे सदश्य गावभागातील भक्तगण मोठ्या संखेने उपस्थित होते.

### 'अ' विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला द्वितीय क्रमांक




**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अंतर्गत नुकत्याच पार पडलेल्या महाविद्यालयीन 'अ' विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरच्या बी. फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या स्पर्धेत नावेद शेख (११० किलो गट), अरविंद तपसे (९४ किलो गट) आणि श्रीनिवास शिंदे (६५ किलो गट) या तिघांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक श्री. ऋषिकेश मस्के यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थीयांनी स्पर्धकांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.


MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E - Tender Notice**

The Executive Engineer, Nilanga Division on behalf of M.S.E.D.C.L. (employer) invites On-line bids from eligible bidders for

| Sr. No. | Tender No. | Particulars of work | Est. Cost Rs. in Lakhs | EMD in Rupees | Tender Price in Rs. (Inc Tax) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | T-03 | E-Tender for Work of To & From transportation of failed & repaired Distribution Transformers, loading unloading & other line material including scrap materials at Nilanga Filter unit/store meter testing unit Nilanga Division" **as per MSEDCL Specifications.** | Rs.20.00 Lakhs (Twenty Lakhs) | Rs. 20000/- (Twenty Thousand) | Rs. 2950/- (Two thousand nine hundared fifty only) |
| 2 | T-02 | E-Tender for Work of Comprehensive Annual contract for maintenance of PC's, Printers in sub-Division office, Section offices and Nilanga Division office" **as per MSEDCL Specifications.** | Rs.05.00 Lakhs (Five Lakhs) | Rs. 5000/- (Five Thousand) | Rs. 1180/- (One Thousand one Hundred Eighty Only |

The above **T-02 & T-03** E-tender documents will be available from **Dt.26/08/2025 to 30/08/2025 For T-02 & T-03/25-26** in electronic format and has to be downloaded from **https://etender.mahadiscom.in/eatApp/** after payment of e-tender fees online. The bidder can upload the e-tender on website latest by **Dt.01.09.2025 up to 23.55 Hrs.** This office will not provide hard copy of the e-tender documents.
This office reserves the right to reject any or all the offers without assigning any reason thereof.

**Executive Engineer (NLG)**
**M.S.E.D.C.L., Division, Nilanga**

**PRO No. LZ/106/25-26**



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६